# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ | अकोला. रविवार ता० ४ माहे मे सन १८७९ इसवी | अंक. १७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र शुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिराती.

COMEDY OF ERRORS.

### कामडी आफ एरर्स.

अथवा.

### भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

नवीन सुदर्शन चरित्र नाटक, मार्कंडेय चारित्र व कबीराख्यान.

खालीं सही करणाराकडून देण्यांत येते कीं, देवी भागवतांतील कथेच्या आधारें मीं "सुदर्शन चरित्र" या नांवाचें सप्तांकी नाटक सुमारें दोन पृष्ठें संस्कृत तसेंच हिंदुस्थानी आणि थोडा रानटी भाषेचा मासला दाखवून महाराष्ट्र भाषेंत रचिलें आहे. यामध्यें आर्या, ओव्या, दिंड्या, अभंग, साक्या, अंजनीगीत, श्लोक, कांहीं तऱ्हेतऱ्हेचीं वृत्तें, पदें, झुले, गजल आणि लावण्या मिळून सुमारें १०५ पद्यें असून बाकीचें केवळ भाषण अशा प्रकारें याची रचना आहे. या नाटकाबद्दल मला दक्षिणा प्राईझ कमिटीकडून बक्षीस मिळालें. यांत शृंगारादि रस. बहुत गुलजारीचे आहेत. याचीं पृष्ठें २२५ होतील. यांत कांहीं देखाव्याचीं चित्रेंही घातलीं जातील. याचा ... वा द्वादशपत्री असून कागदही चांगले जाड असतील याचें संविधानक मोठया चातुर्याचें असून त्यांत देवीचें महत्व व तिच्या मंत्रादिकांचा प्रभाव फार चमत्कारिक दर्शवि... आहे.

हें नाटक तसेंच मार्कंडेय कथानक व कबीराख्यान आणि शेवटीं काशीची भूपाळी, या सर्वांचें एकच पुस्तक बांधावें असें योजिलें आहे. हें छापून व बांधून तयार करण्याचें काम, पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत लवकरच सुरू होईल. हें घेणारांस फार सोयीवार पडावें, यासाठीं याची किंमत एक रुपया ठेविली आहे, तथापि ता० १५ एप्रिलचे आंत सही करणारास दोन आणे कमी पडतील. बाहेर गांवच्या लोकांस पोस्टेज व बंगी खर्च मिळून ०२ शिवाय पडेल.

माझी ग्रंथरचना करण्याची शिस्त, मीं पूर्वी केलेलें गौरिहरविनोद नाटक छापून प्रसिद्ध झालें आहे त्यावरून प्रायः त्याचे वाचकांच्या समजण्यांत आलीच असेल. सारांश रसिक ज्ञात्यांनीं कविपरिश्रमानंद कारणें मनांत आणून या पुस्तकास आश्रय द्यावा अशी त्यांस विनयपूर्वक सूचना आहे.

सदर्हू पुस्तकाबद्दल अगाऊ वर्गणी पाठविणें ती पुणें ज्ञानप्रकाशचे म्यानेजर यांजकडे पाठवावी.

सूचना—सदर्हू जाहिरात मराठी वर्तमानपत्रकर्त्यांनीं आपआपल्या वर्तमानपत्रांत निदान तीन वेळ घ्यावी. त्याबद्दल त्यांस एक पुस्तक पाठविण्यांत येईल.

(सही) अनंत दीक्षित बिन महादेवदीक्षित जोशी चिपळोणकर दस्तुर खुद.

## नोटिस

बुधपुरी वल्लद रामपुरी गोसावी रहाणार अकोल यास खुशालपुरी गुरु शंकर गोसावी रहाणार शहर अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आह्मी आपले मालकीची जागा तुह्मास सुमार ७ वर्षां पूर्वी रहावयास दिली होती त्या जागेवर घराच्या व अवाराच्या भिंती पुरातन आह्मी बांधलेल्या आहेत वर छावणी मात्र तुह्मी रहाण्या करितां केली आहे व त्यांत तुह्मी सुखवस्तीनें राहूं लागले अलीकडे तें घर तुह्मी विकावयास काढिलें आहे असें आमचे ऐकण्यांत आलें आहे. ह्मणून मुद्दाम ही नोटिस तुह्मांस देण्यांत येतें कीं सदर्हू घर तुमचे मालकीचें नसल्यामुळें तें तुह्मास विकण्यास किंवा दुसरे कोणास घेण्यास अधिकार नाहीं. आजवर आह्मी तुह्मास खुषीनें राहूं दिलें पण आतां आह्मी तुह्मास तेथें राहूं देण्यास इच्छित नाहीं. तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमची जागा खाली करून द्यावी पाहिजे असल्यास तुमचे मालकीची छावणीचीं लाकडें घेऊन जावीं. घर खालीं न केल्यास कायदेशीर तजवीज करून तुह्मास बाहेर काढावें लागेल व तेणेंकरून कोर्टखर्च तुह्मावर बसेल या नोटिसीचा खर्चही तुह्मापासून घेतला जाईल. कळावें तारीख २८ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) खुशालपुरी गुरु शंकरपुरी गोसावी निशाणी हातची असे.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. बरेच दिवसापासून आपले पत्रामध्यें या भागाचा मजकूर प्रसिद्ध झाला नाहीं करितां थोडासा मजकूर आपल्या पत्रद्वारें प्रसिद्ध व्हावा या हेतूनें चार ओळी सादर करितों त्यांस आश्रय मिळावा.

पूर्वींचा शिक्षण क्रम आणि हल्लीचा शिक्षणक्रम. सदर क्रमामध्यें अतिशय फरक झाला आहे तो येणें प्रमाणें:—

पहिल्या वेळेस मी शाळेंत शिकत होतो त्या वेळेस अमुक दिवसांत अमुक शिकले पाहिजे असा कांहीं नियम नसून पुस्तकेंहा सर्व विषयावर फारसी नव्हती. अमुक प्रतीच्या शाळेमध्यें अमुक इयत्तेपर्यंत शिकण्याचा नियम नव्हता. मात्र शाळेंत मुलें पुष्कळ असलीं ह्मणजे ती शाळा चांगली, तिजवरील मास्तर हुशार असें समजत असत. फीहि कमी होती नीचं ज्ञातीचीं मुलें बहुधा शाळेंत घेत नसून तीं शाळेंत घेण्याविषयीं कोणी तसदीही देत नव्हतें. फी मुले सर्व जातीचीं सारखीं घेत असत. फक्त ( नीच जातीची खेरीज करून) आतां जो फेर फार झाला आहे तो येणें प्रमाणें:—

हल्लींचा शिक्षण क्रम केवळ पोपट क्रमासारखा झाला आहे. जरी वरिष्ठ अधिकारी तो लपवितात, तरी तो माझ्यानें लपविला जात नाहीं. कारण कित्येक अधिकाऱ्यांचें ह्मणणें आहे कीं मुलांनीं पाट करूं नये. जेथपर्यंत त्यांच्या अकलेनें समजेल तितकें समजवावें. वरें असें करणें एक अंशीं चांगले आहे परंतु वेळ फार लागणार आहे आतां वेळेकडे लक्ष दिलें तर एका वर्षांत एक इयत्ता मुलानें पास केलीच पाहिजे व हा नियम पहिल्या इयत्तेपासून सर्व इयत्तांस लागू आहे. ह्मणून शिकणें पोपटासारखें होतें. शिवाय हुशारी काय ती मुलें कमी ज्यास्ती पास होण्यावर आहे. आतां मुलें पास होणें केवळ वेळेवर अवलंबून आहे. एखादेवेळेस असा प्रकार घडून येतो कीं, कित्येक परिक्षेचे वेळेस आजारी असतात, कित्येक परगावीं गेलीं असतात, आणि थोडी बहुत गैरहजर असतात. ह्मणून एखादे वेळेस असें घडून येतें कीं, शेकडा ५० मुलें वर लिहिलेल्या कामा निमित्त गैरहजर असतात. आणि परिक्षेत मुलें कमी उभीं राहिलीं ह्मणजे अर्थातच मुलें ही कमी पास होतात. असें झालें ह्मणजे मास्तरास कांहीं येत नाहीं, मास्तर कामास नालायक, त्याची बदली कमी पगारावर करावी, अशा प्रकारच्या शिफारसी होतात 'आतां वर सांगितलेल्या प्रकाराशिवाय एक प्रकार राहिला तो कोणता ह्मणाल तर गैरहजरीपणा वऱ्हाडांत मुलें दोनप्रहरून फार गैरहजर असतात व ज्या गावामध्यें शेतकरी लोकांचा भरणा ज्यास्त त्याठिकाणीं सकाळूनही गैरहजर असतात. वरिष्ठ अधिकारी या प्रकाराकडे बिलकुल लक्ष देत नाहांत. ते ह्मणतात कीं कोणताही कारणें असोत परंतु वर्गांतील सर्व मुलांचा सारखा अभ्यास असला पाहिजे. असो यावर लिहिल्या प्रकारामुळें खेडे गावांतील शाळांवरील मास्तरांस असें भय प्राप्त झालें आहे कीं कोणत्या दिवशीं काय होईल हें कळत नाहीं. शिवाय ज्ञातीसंबंधी तर बोलणेंच नको. हल्लीं वऱ्हाडांत नीच जातीचे लोक नवीन शिकलेले लोक ( ग्रयाजुएट ) हे तालुकाकचेरींत अवलकारकुनाची नोकरी २५ रुपये पगाराची पतकरूं लागले आहेत. तर म्याट्रिक्युलेशन, लिटलगो अनम्याट्रिक्युलेटेड, आणि शुद्ध मराठी ६ वी इयत्ता शिकलेल्या लोकांस किती रुपयांची नोकरी मिळणार हें कळत नाहीं. सर्व ज्ञातीचे लोकांस विद्यामृत सारखें मिळें, त्याप्रमाणें नोकऱ्याही. येणेंकरून उंच वर्णाचे हिंदू लोकांस महत् संकट प्राप्त झालें आहे तें सांगतां पुरवत नाहीं.

आपले राजे परदेशस्थ असल्यामुळें आपल्या लोकांची खरी स्थिति त्यांच्या नजरेपुढें येत नसल्याळें ते समजतात कीं, हिंदू लोक श्रीमान आहेत, लिहिण्यास दुःख वाटतें कीं कित्येक लोकांस खाण्यास अन्न देखील मिळत नाहीं. या वर्षीं तर कहर उडाला आहे. डोंगरांत रहाणारे लोक तर तृणबीज खाऊन राहूं लागले आहेत, व हें कृत्य शेकडो लोकांनीं पाहिलें आहे. असा प्रकार असून लोक कसे सधन आहेत हें कळत नाहीं. या वर पुढील खेपेस लिहूं. लोभ असावा ही विनंती.

क्ष०

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. लिहिण्यास कारण की, महाराज या जगतामध्यें काय चमत्कार होतील हें कोणी सांगूं शकणार नाहीं; परंतु प्रत्यक्ष एक चमत्कार पाहिला तो आपण आपले पत्रीं सर्वांस कळविल्यास मजवर मोठे उपकार होतील.

जळगाव तालुक्यांत इठखेड हें पूर्णाकांठीं असोन तेथें दत्तात्रयाचें ठिकाण आहे. त्या जागीं चैत्र शुद्ध १५ स यात्रा भरत असते. ती पहाण्यास गेलों असतां एके नाल्यांत रानांतील एका मांजराची आणि एका सापाची लढाई लागलेली पाहिली. सापाचा रंग लाल असून लांबी अजमास सहा सात फूट होती व मांजराचा रंग काळसर होता. ज्या वेळेत ह्या दोघांची लढाई लागली त्या वेळेत मांजरानें वाघाचे शिकारीप्रमाणें दबकी साधून सापाचे अंगावर धावून जाऊन पंजांनीं आणि तोंडांनीं बोचकरावें. तितक्यांत सापानें आपला फणा काढून डंक मारित जावें. व शेपीनें वेष्टित जावें, तेव्हां मांजरानें तोंडानें चावून सोडवावें. याप्रमाणें उभयतांची लढाई दीड तास होऊन अखेरीस दोघांचाही आवेशाचे जोरांत मागें हटतांबरोबर प्राणांत झाला. कळावें.

खामगाव, तारीख २१ माहे एप्रिल १८७९इ. — एक यात्रेकरू.

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख शुद्ध १३ शके १८०१

## सुभाषित

सुभाषितेन गीतेन युवतीनांच लीलया
यस्य न द्रवते चित्तं सवै मुक्तोऽथवा पशुः

सुभाषित ह्मणजे जें "चांगलें बोललेलें" तें ह्मणजे चांगलें भाषण. चांगले, मधुर भाषण कोणीं केलें ह्मणजे त्यापासून आपणांस किती आनंद वाटतो हें प्रत्येकानें आपल्या अनुभवावरून पहावें. तें कशाला? जुनीं पेशवाईच्या वेळचीं किंवा प्रसंग विशेषाचीं चतुर संभाषणकर्त्यांचीं जीं बोलणीं आपल्या ऐकिवांत आलेलीं आहेत तीं मंडळींतें निघालीं ह्मणजे त्यांहीं करून किती वेळ पर्यंत मंडळीचें मनोरंजन होतें बरें ! सुभाषिताचे माधुर्याची थोरवी वरील श्लोकावरून ध्यानांत येईल. गाणें आणि तरुण स्त्रियांच्या क्रीडा किती मनोहर आहेत हें सर्वांच्या अनुभवास आहेच. आणि त्यांच्याच साहचर्याला सुभाषित ही घातलेलें आहे तेव्हां याची मनोहरण शक्ति तितकीच, हा श्लोक कर्त्याचा अभिप्राय व आपणाही याहून निराळा अभिप्राय काय देणार आहो? अस्तु. संस्कृत-भाषेमध्यें सुभाषिताचें एक प्रचंड खातेंच आहे ह्मणायाला काय हरकत? जितकें जुनें सुभाषित ह्मणून आहे तितक्याचेंच एका ग्रंथामध्यें एकीकरण जर केलें तर तो ग्रंथ कदाचित भागवत भारता एवढा देखील होईल. निरनिराळ्या ठिकाणच्या विद्वज्जनांस निरनिराळे सुभाषित श्लोक किती पाठांत असतात! सुभाषित श्लोक जरी संस्कृत असतात तथापि प्राकृत जनांसही ते रंजवितात. श्लोक रचना समजल्यास व शद्बांची योजना आणि ठेवण हीं डोळ्यांपुढें दिसल्यास विशेष आनंद वाटेल हें खरें परंतु कवीची कल्पना ध्यानांत आली असतां जो आनंद व चमत्कार वाटायाचा कीं जेणेंकरून मन कांहीं वेळपर्यंत आपल्याशींच रमत असतें व हास्य वारंवार अगदीं ओठापर्यंत येऊन ठेपतें ( तशी कल्पना मात्र पाहिजे ) तो आनंद व चमत्कार प्राकृत जनांसही कांहीं कमी वाटेल असें नाहीं. अर्थात उभयतां जन सहृदय असले पाहिजेत.

कवींच्या कल्पना कशा धांवत असतील याचें आपणास मोठें नवल वाटतें. आणि वर्णन केलेल्या गोष्टी तर अगदीं साधारण असतात. परंतु जरी त्या साधारण असल्या तथापि तशा प्रकारची कल्पना आपल्या स्वप्नांतही आलेली नसते. असो. आतां कांहीं सुभाषित श्लोक आपण घेऊ या.

आर्या.

अयि वाक् त्व मुत्तमर्णा,
सुधाधमर्णा सुधाकरः प्रतिभूः ॥
स्वर्गं गता ह्यधस्तात्,
सा;सोपि कलंकितो निशि भ्रमाते ॥

कोणा एका कवीच्या मनांत वाङ्माधुर्याची स्तुति करावी असें आलें व ती अशी कीं, अमृतही त्याहून कमी मधुर मग वरील पद्य त्यानें रचलें. त्यांतील कल्पना अशी आहे कीं, "सुधा ह्मणजे अमृत ह्मणून जें कांहीं स्वर्गाचे ठायीं आहे असें आपण समजतों तें पूर्वीं या भूलोकीं होतें. त्या सुधेचे मनांत एकदां असें आलें कीं, आपण माधुर्याचा व्यापार करावा. परंतु स्वतःजवळ तर भांडवल नाहीं. तेव्हां माधुर्याचा सावकार जी वाणी ती पाशीं तें गेलें, व माधुर्य ऋण मागूं लागलें. परंतु पत नसल्यामुळें वाणीनें जामीन मागितला. आतां जामीन ह्मटला ह्मणजे ऐवजदार पाहिजे. तेव्हां असा जामीन चंद्र ( सुधाकर ) सांपडला मग वाणीनें ऋण दिलें. पुढें व्यापारांत आम्र, इक्षु, फणस, जांब इत्यादिकांनां तें माधुर्य वाणीनें कर्जाऊ दिलें व जिकडच्या रकमा तिकडे थकल्या तेणेंकरून वाणीचें दिवाळें निघालें. इतकी कल्पना मनांत आल्यावर कवि ह्मणतो. आर्येचा अर्थ. हे वाणी, तूं धनको ( होतीस आणि ) सुधा ह्मणजे अमृत ( तुझी ) ऋणको ( झाली आणि ) चंद्र ( तिला ) जामीन ( राहिला .) ( पुढें सुधेचें दिवाळें निघालें तेव्हां जसे अलीकडे गोमंतकीं वगैरे पळून जातात तशी ) ती खालून ( ह्मणजे या भूलोकांपासून ) स्वर्गा प्रत गेली, ( आतां जामिनाची अवस्था. ) तोही कलंकित होत्साता ( तोंडाला काळें लाऊन ) रात्रीं फिरतो. ( वारंट विरंट निघेल ह्मणून दिवसास त्याच्यानें बाहेर पडवत नाहीं. ( काय विलक्षण कल्पना ही ! दुसरा.

अनुष्टुप.

दृशा दग्धं मनसिजं जीवयंति दृशैव याः
विरूपाक्षस्य जयिनी स्ताःस्तुवे वामलोचनाः

एथें कवीस ही कल्पना सुचण्यास मूळ हें कीं सुंदर स्त्रियांनीं कटाक्षरूपेंकरून पुरुषांकडे पाहिलें असतां त्यांच्या अंतःकरणांत तात्काल कामोत्पत्ति होते. कवी ह्मणतो.

अर्थ (शिवानें) दृष्टीनें जाळलेल्या कामाला ज्या दृष्टीनेंच जिवंत करितात (त्या) शिवाला जिंकणाऱ्या कामिनी स्त्रियांची मी तारीफ करितों. अर्थ स्पष्टच आहे. ह्मणजे शिवानें नेत्रानें काम जाळला आणि कामिनी स्त्रिया नेत्रानेंच त्यास जिवंत करितात. तेव्हां शिवाच्यावर त्यांची तान झाली. कारण नाश करणें सुलभ आहे परंतु पुन्हा पूर्व स्थितीवर आणणें कठीण. शिवाय दुसरा मोठेपणा हा कीं ज्या शस्त्रानें शिवानें नाश केला त्याच शस्त्रानें या जिवंत करतात. धन्वंतरि आणि परिक्षितीस दंशकरण्या करितां चाललेला ब्राह्मण रूपधारी तक्षक यांच्या गोष्टीसारखीं ही गोष्ट झाली. ती गोष्ट सर्वांस ठाऊक असेलच. आणखीः—

शा० वि०

सूचीवेदन मात्र संभृत भवः क्षोणीशवामभ्रुवा,
मंगेपुस्तन दुर्गसीम्निलभते लीला सुखंकंचुकः॥
नाराचै र्निशितै र्निखात वपुषां पुंसा मिहा योधने
स्वर्गस्त्रीकुचकुंभसंभवपरीरंभः कथं दुर्लभः

यांत कल्पना अशी कीं स्त्रियाची चोळी नुस्ते सुईचे घाव ( टोंचणें ) सोसते तेणेंकरून उत्तम स्त्रियांच्या स्तनाचे ठायीं तिला वास प्राप्त होतो. मग युद्धांत तीक्ष्ण बाण सहन करणारे जे योद्धे त्यांनां अप्सरांचें आलिंगन कां प्राप्त होणार नाहीं ! श्लोकार्थ —सुईच्या टोंचण्यानेंच प्राप्त झालें आहे जन्म ज्याला ( असा जो ) कंचुक ( ह्मणजे चोळी ) तो पृथ्वीपति राजांच्या उत्तम स्त्रियांचे शरीराचे ठायीं स्तनरूप किल्याच्या सीमेवर क्रीडा सुखातें पावतो. ( नुस्ती सुईची वेदना सहन केल्याचें एवढें फळ. तर ) हइलोकीं युद्धामध्यें तीक्ष्ण बाणांनीं जखमी झालें आहे शरीर ज्यांचें ( असे जे ) पुरुष त्यांनां सुरांगनांच्या कुंभस्तनांचें आलिंगन कसें दुर्लभ होईल. " आणखी—

आर्या. ( वक्रोक्त्यलंकार. )

नाथ विलोकय मेघं,
नचास्ति पापं तवातिपुण्यायाः ॥
ननु कथयामि पयोधर,
मपसारय कंचुकी मुरसः ॥

वक्रोक्त्यलंकार ह्मणजे बोलणाराच्या मनांतील अर्थ लक्षांत न आणल्यासारखा करून मूळचे शद्ब फिरवून त्याच बोलण्याचा अर्थ आपण अन्यथा करणें. याचें हें उदाहरण आहे. हा स्त्री पुरुषांचा संवाद आहे. कोणी स्त्री आपल्या पतीस ह्मणते— अर्थ :: हे प्राणनाथ ( हा ) मेघ ( ढग ) पहा" पतीनें त्याच चरणाचा अर्थ असा घेतला कीं, " मे—अघं " ह्मणजे " माझें पाप पहा. " असा अर्थ घेऊन तो उत्तर करितो.—अत्यंत पवित्र ( अशी जी तूं त्या ) तुला पाप मुळींच नाहीं. " या नंतर आपला मनांतला हेतु पतीस समजला नाहीं असें समजून स्त्री शद्बांतरानें पुनः ह्मणते." ( तेंनव्हे हो ) मी पयोधर ( मेघ वाचक दुसरा शद्ब ) या विषयीं बोलते ' आतां पयोधरयाचा दुसरा अर्थ स्तन तो घेऊन पति ह्मणतो " ( बरें आहे ) उरावरून चोळी दूर कर ( ह्मणजे तूं काय ह्मणतेस तें पहातों." कां, या श्लोकांतील भाषण किती चमत्कारिक आहे बरें! आणखी—

मंदाक्रांता

मंदं मंदं कुसुमित महारण्य रेवात रेवा
सेवापुण्यं परिणत मिदं तावकं तर्कयामि,
यत्त्वां मत्वांतिकमुपगतं कामरामाभि रामा
रामाःस्वैरं कुचकलशतो वस्त्र मुत्सारयंति

स्त्रिया एकांतीं बसलेल्या असतांनां जर एखादेवेळेस गार वाऱ्याची झुळूक आली तर वारा लागावा ह्मणून आपल्या स्तनांवरून पदर दूर करतात या गोष्टीवरून सदरील श्लोकांतील कल्पना कवीच्या मनांत आली. कवि वाऱ्यास उद्देशून बोलतो. अर्थ— मंद मंद अशा प्रकारें (वाहून) सुगंधित केलें आहे (प्रफुल्लित पुष्पांवरून आल्या मुळें ) मोठें अरण्य ज्यानें (अशा) हे वायो (रेवानदीच्या तीरीं असणारा वायु असें घ्यायाचें ) रेवानदीची सेवा केल्याचें हें तुझें पुण्य फलद्रूप झालें (असें) मला वाटतें. कारण कीं तूं जवळ आलास असें जाणून (पाहून) रती सारख्या सुंदर अशा स्त्रिया (आपल्या) कुंभासारख्या स्तनांवरून पदर दूर करतात. नाहीतर साधारण वहिवाट ह्मटली ह्मणजे कोणी परकी पुरुष किंबहुना स्वकीय पति आला असतां स्तनांवर पदर ओढण्याची वहिवाट आहे. तेव्हां तुझा आदर जर अशा प्रकारें होतो तर हें तुझें पुण्य यांत संशय नाहीं.

## स्त्रीविषयक लीला.

कलकत्याकडे मि० सार्जंट ह्मणून ईस्ट इंडिया रेल्वेकडे नोकर आहेत त्यांची स्त्री त्याच कंपनीकडील विलियम बर्नार्ड या नावाच्या गृहस्थाशी लागू झाली होती. पुढें आपले नवऱ्याची दुसरीकडे बदली झाली असें पाहून बर्नार्ड साहेब कलकत्यास रहात होते त्यास तिनें पत्र लिहिलें कीं, मला २०० रुपयांची गरज आहे तेवढे तुह्मी पाठवून दिले असतां मी नवऱ्याचें घर सोडून कायमची तुह्माजवळ येऊन राहीन. साहेबास ती गोष्ट मान्य झाली व रुपये घेऊन स्वतांच तिच्या गावीं असेनसोल एथें गेले. तों त्यांनीं असें पाहिलें कीं, आपलें प्रियपात्र दुसऱ्या एका गृहस्थास लागू होऊन त्यास घरीं घेऊन राहिलेलें आहे. तेणें करून त्यास फार राग आला व तो एक शद्ब न बोलतां मागच्या पायीं मागें उलटला. रात्रीं पिस्तुल घेऊन तिच्या बंगल्यावर गेला. तेव्हां त्या पुरुषा सहवर्तमान ती खोलींत निजली होती. तेथें चाल करून जाऊं लागला तो एक अश्या नोकर होती ती आडवी आली, व जाऊं देईना तेव्हां भरलेलें पिस्तुल त्यानें तिजवर उडविलें तों ती ठार झाली व लोक जागे झाले. त्या स्त्रीच्या हातांत मिसेस सार्जंट इचें एक मूल होतें पण ईश्वर कृपेनें त्याला कांहीं इजा झाली नाहीं. बर्नार्ड साहेबास हल्लीं धरून कैद केलें आहे व त्याची चौकशी चालू आहे.

## विजयनगरचे राजाचा मृत्यु.

मद्रास इलाख्यांतील एक मोठे संस्थानिक विजयनगरचे महाराज ता० २८ एप्रिल रोजीं मरण पावले असें वर्तमान आलें आहे. याना नाइट कम्यांडर आफ धि स्टार आफ इंडिया ही पदवी होती. हे उदेपुरच्या राण्याचे वंशज होते. हिंदु धर्मावर यांची उत्तम निष्ठा असून काशीक्षेत्रीं यांनीं पुष्कळ परोपकारांचीं कामें केलेलीं आहेत त्यामुळें यांचा सर्व प्रांतीं लौकिक आहे, यांनां इंग्लिश भाषा फार उत्तम येत होती. व शर्यती, बिलियर्डस वगैरे इंग्लिश खेळ खेळण्याचा यांनां मोठा शोक असे.

### गिरण्या विषयीं व्याख्यान.

मुंबईस न्याशनल इंडियन असोसियेशन सभेपुढें मि० मंचरजी फ्रामजी पाटेल बी ए यांनीं गेल्या मंगळवारीं गिरण्यावर एक व्याख्यान दिलें. तें फार सुरस होतें. हिंदुस्थानांत गिरण्या स्थापन झाल्या व त्यांत लक्षावधि रुपये भांडवल पडून कायदेशीर व्यापार चालू झाला होता तो आतां ढासळत चालला ह्मणून त्यांनीं लेख प्रदर्शित केला. त्यांचे सांगण्यांत असें आलें कीं गिरण्यांवर एजंट नेमण्याची तऱ्हा अतिशय वाईट आहे. एजंटास मालावर दर पौंडास पावआणा कमिशन मिळतें. हें प्रथमदर्शनीं फारसें दिसत नाहीं पण यांतच गिरणीचा समूळ नाश होतो. यांनीं एका एजंटाची गोष्ट सांगितली कीं, २१ वर्षांत त्याला गिरणीचे किमती इतकें कमिशन मिळालें. दुसरी एक गोष्ट सांगितली कीं गिरणीचें भांडवल दाहा लक्ष रुपये असलें तर एजंटास प्रतिवर्षीं ३०००० रुपये कमिशनाबद्दल मिळतात. अशा कारणामुळें

कित्येक गृहस्थ एजंटाच्या नादीं लागून अन्यायही करूं लागले. अधिक शेर आपले आप्त इष्ट मित्र यांत खपवावे व त्यांच्या संमतीनें एजंट व्हावें. कित्येक तर पुरेसें भांडवल नसतांही हिमतीनें एजंट बनले. व डायरेक्टर लोकांसही त्यांचीं कसबें न कळल्यावरून त्यांचें फार नुकसान झालें. सबब एजंट नेमण्याची रीति अगदी बंद केली तर गिरण्यांस फायदा होईल. वगैरे बहुत प्रकार त्यांनीं सांगितले. गिरण्यांचे मालक याविषयीं चांगला विच्यार करितील असें आह्मी इच्छितों

---

मद्रास इलाख्यांत एका आफगाणाच्या दिवाणी दाव्याचा चमत्कार झाला तो असा:- कडाप्पा एथील जिल्हा कोर्टांत हस्तींदंताचा व्यापार करणाऱ्या अब्दुल रहिमान नावाच्या अफगाणानें एकाकडून आपली १७६०० रुपयांची रकम येणें होती तिजबद्दल दावा केला तो जडजानीं हातीं येतांच फेकून दिला याला कारण त्यांनीं असें लाविलें कीं आफगाण लोक हल्लीं ब्रिटिश सरकारचे उघड शत्रू झाले आहेत. अफगाणाच्या बारिस्टरानीं असें ह्मटलें कीं चक्रवर्तिनी साहेबानीं लढाईच्या सुरवातीच्या वेळीं जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं आमची लढाई फक्त शियरअलीशी आहे अफगाणच्या लोकांशीं नाहीं सबब अर्जदाराचें इंडियन कोर्टांकडून संरक्षण व्हावें असा त्याला हक्क आहे. पुढें हायकोर्टांत अपील झालें त्यांत त्या जडजानीं वादीच्या बारिस्टराचे भाषणाप्रमाणेंच आपला अभिप्राय दर्शवून दाव्याचा अर्ज फैलावर घेऊन त्याची चौकशी करण्याकरितां अवल कोर्टाकडे परत पाठवला.

---

नवीन रेल्वे—दुष्काळग्रस्त गरीब लोकांस मजूर काम मिळावें ह्मणून सरकारानें सोलापुराजवळून होडगी एथून कर्नाटकांत गदग पर्यंत रेल्वे करण्याचें काम सुरू केलें आहे. हें फार चांगलें केलें. मागील दुष्काळांत धोंड मनमाड रेल्वे झाली. आतां ही हो[illegible]र. लोकांस वाटत होतें कीं धोंड रेल्वेच पुढें वाढवून सातारा कोलापुराकडे नेतील. व तो प्रदेश बाजूस पडलेला उजेडांत आणितील परंतु तसें झालें नाहीं. आमचे ऐकण्यांत आहे कीं सातारा कोलापुराकडील रेल्वे करण्याचे विच्याराकरितां सर्व्हे झालीं आहे. तेव्हां पुढें मागें हेंही काम होईल.

---

मि० नाइटस साहेब यांणीं हिंदुस्थान देशाचे कल्याणाकरितां विलायतेस जाऊन तेथें आठवड्याचें वर्तमानपत्र स्टेटस्मन नावाचें काढण्याचा विचार केला आहे. [illegible]ंत फक्त हिंदुस्थानास काय पाहिजे या गोष्टीचे विचार येणार व पार्लमेंट सभेंत आणि तिकडील परोपकारी लोकांत हिंदुस्थानाविषयीं कळवळा उत्पन्न करून व इकडील वस्तूंचें खरें ज्ञान देऊन होईल तितकें या देशाचें दैन्य हरण करावें असा नाइ[illegible] साहेबांचा हेतु आहे. ईश्वर त्यांच्या प्रयत्ना[illegible] यश देवो.

या प[illegible]राची किंमत सालीना १० रुपये आहे. [illegible] लंडन एथें पुढील महिन्यांत निघणार अ[illegible] याला या देशांतही पुष्कळ वर्गणीदार [illegible]त असें आह्मी इच्छितों.

## वऱ्हाड.

कर्नल बुष्बी साहेब बुल्ढाण्याचे डिपुटी कमिशनर कालच्या मागील शनिवारी मलकापुर स्टेशनावर आगगाडींत बसून विलायतेचे रजेवर गेले. त्यांनां भेटण्याकरितां कित्येक मंडळी येथून गेली होती.

---

मेजर लेन साहेब पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल बुधवारीं उमरावतीहून निघून मुंबईकडे विलायतेस जाण्याकरितां चालते झाले. त्यांचें काम पहाण्यास मे० फ्यारर साहेब यांची नेमणूक झाल्याप्रमाणें ते वाशिमाहून गेले रविवारीं एथें येऊन उमरावतीस गेले.

---

रा. रा. श्रीकृष्ण नरहर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस वाशिमाहून उमरावतीस नेमिलें. व उमरावतीचे रा. रा. केशवराव महिपत खारकर ए. असि. कमिशनर यांस अडगावास नेमिलें व अडगावचे रा. रा. बापुजी रंगनाथ एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस वाशिमास नेमिलें असें समजतें.

---

दारव्ह्याचे तहशिलदार रा. रा देवराव जयकृष्ण यांस अकोटास व अकोटचे तहशिलदार मि० दोराबजी कावसजी यांस दारव्ह्यास नेमिलें. मि० दोराबजी बहुत दिवस अकोलें जिल्ह्यांत होते व ते स्वभावानें फार चांगले असल्यामुळें त्यांचें स्थलांतर इकडील लोकांस खेदकारक होईल.

---

मि० यादअली बाळापुरचे कायमचे तहशिलदार यांनीं पेनशनाचा अर्ज केला व त्यांनां डाक्टरचें सर्टिफिकिट मिळालें.

---

साल मजकुरचे लिटलगोचे परिक्षेस वऱ्हाडांतील दोन उमेदवार होते ते दोघेही पास झाले नाहींत असें कळतें.

---

उन्हाळ्याचे सुटींत रा. रा. निळकंठराव नारायण भट ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल, रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर हायस्कुलांतील फर्स्ट असि० मास्तर, व रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर मिडल क्लास स्कुलाचे हेड मास्तर हे पुण्याकडे गेले.

---

रा. ब. नारायण भाई विद्याखात्याचे डायरेक्टर वार्षिक रिपोर्ट संपवून १५ वे तारखेचे सुमारास मुलीचे लग्नाकरितां पुण्याकडे दोन अडीच महिन्याचे रजेवर जाणार आहेत. मागें ते सिमल्यास गेले होते त्यावेळीं सरकारानें रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर यांस त्यांचें काम पहाण्यास नेमिलें होतें तशीच आतांही व्यवस्था होईल असें वाटतें.

---

क्या० जे एस एफ मेकंजी साहेब यांस वऱ्हाडांत आफिशिएटिंग सेकंड क्लास सुपरन्युमररी असिस्टंट कमिशनर केलें असें हिंदुस्थान सरकारचे ग्येझेटावरून समजतें.

---

मि० किट्स साहेब असिस्टंट कमिशनर एक महिन्याचे रजेवर जाणार आहेत.

---

मेजर लाटण साहेब डिपुटी कमिशनर उष्णकाळामुळें नरनाळ्यावर गेले.

---

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील यांजकडे त्यांच्या मुलीचें व पुतणीचें अशीं दोन लग्नें या आठवड्यांत होणार आहेत. समारंभ मोठ्या हैंसेनें करण्याविषयीं ते तत्पर आहेत. मंडप मोठा व उंच व्हावा ह्मणून त्यांनीं लाकडी सामान नागपुराहून आणिवेलें व बिलोरी सामान मुंबईहून आणिवेलें आहे. मध्यभागीं कारंजें सुंदर केलें आहे. यावरून हा समारंभ मोठ्या थाटाचा होईल यांत संशय नाहीं.

---

अकोला म्युनिसिप्यालिटीची आजवर अशी वहिवाट होती कीं कोणी मनुष्य आपले घराचें किंवा भिंतीचें वगैरे काम बिगर परवानगीनें करूं लागला, ह्मणजे त्याला हरकत करावी. नंतर घरवाल्यानें अर्ज करावा व त्याची चौकशी होऊन नंतर त्यास परवानगी देण्यायोग्य असेल तर द्यावी. त्याविषयीं नुकतीच जनरल कामिटी भरून असा ठराव झाला कीं, कोणाही मनुष्यास कांहीं नवीन काम अगर जुने कामाची दुरुस्ती करणें असेल तर त्यानें कमिटीस अर्ज वगैरे न करितां जाहिर नोटिस देऊन एकदम काम सुरूं करावें. नंतर कमिटीनें तें पाहून हरकत करण्यायोग्य असल्यास लेखी हुकुमानें हरकत करावी, अगर काम चालू द्यावें. ही वहिवाट लोकांस सोईची होईल. व येणेंकरून अर्ज करण्याचा, परवानगी मिळविण्याचा, व कामाचे खोटी करून बसण्याचा लोकांचा त्रास चुकेल.

---

एथें तासगावचीं दोन नाटकें आलीं होतीं तीं या आठवड्यांत एकत्र झालीं व नंतर त्यांचे दोन खेळ झाले. कालचा खेळ शेवटचा होऊन आतां ते उमरावतीस जाताहेत. व एथें सांगलीचें नाटक हल्लीं खामगावास आहे तें येणार आहे. त्याचे प्रमुख रा. रा. धोंडोपंत मराठे ह्मणून आहेत व नाटकें फार चांगली करितात. पुणें मुंबई कडे ते नावाजलेले आहेत सबब त्यांच्या नाटकापासून एथील लोकांस चांगली कर्मणूक होईल. असें वाटतें; मृच्छकटिक, मालती माधव, जयपाळ, शाकुंतल, उत्तर रामचरित्र, वेणीसंहार, पेशव्यांचीं नाटकें इत्यादि ते फार चांगले खेळ करितात अशी आख्या आहे तसें असल तर हीं इचलकरंजीकरावर तोड झाली व येणेंकरून येथील विद्वान व चतुर लोकांचेही ते मनोरंजन करितील व त्यापासून त्यांचा फायदा होईल व अधिक सुधारणा होईल असें आह्मांस वाटतें.

---

आह्मांस लिहिण्यास परम दुःख वाटतें कीं अगदी तरूण, हुशार, चलाख, बहुश्रत, आमचे परम मित्र व चांगल्या अधिकारारूढ झालेले गृहस्थ रा. रा. गोपाळ श्रीकृष्ण खापरडे बुलढाण्याचे सेकंड क्लार्क हे गेले रविवारीं बोराखडी एथें मुंजीस गेले असतां नदींत बुडून मरण पावले. हें वर्तमान ऐकून त्यांस जे जे जाणत असतील त्यांस त्यांस अतिशय दुःख झाल्यावाचून राहणार नाहीं. व त्यांचे तीर्थरूप रा. रा. श्रीकृष्ण बापुसाहेब यांवर दुःखाचा पर्वत कोसळला पण परमेश्वर इच्छेपुढें कोणाचा कांहीं इलाज नाहीं. बापुसा. बुधवारीं एथें येऊन गुरुवारीं इलिचपुरांकडे चिरंजीवाचे उत्तरकार्यार्थ गेले. बापूसाहेबास स्वतां ४०० रुपये पगार व त्यांस दोनच पुत्र एक गोपाळराव याप्रमाणें विख्यात व धाकटे रा. रा. गणपतराव बी ए झालेले असून एल एल बी ची तयारी करीत आहेत. येणेंकरून ते सुखसागरांत निमग्न असतां व ईश्वराचे कृतोपकार आठवीत असतां त्यांच्यावर अकस्मात ही आकाशची कुऱ्हाड येऊन पडली तिचे घाय सोसणें त्यांस परम कठीण झालें आहे. तथापि दगडाची छाती करून विवेक केलाच पाहिजे. व "जगीं सर्व सूखी असा कोण आहे." या भगवद्भक्ताचे वाक्याचा उपदेश घेतला पाहिजे. आतां आमची इच्छा आहे कीं गणपत रावजी हे पुढें शिकण्याचा क्रम सोडून देऊन तीर्थरूप मातुश्रीचे शांतवनार्थ इकडेच राहतील व सरकारही त्यांस चांगले अधिकाराची जागा देईल.

---

अकोल्यास नदीचे काठीं धर्मशाळा बांधण्याचा विच्यार झाल्याप्रमाणें पाया खोदण्याचे व खड्डा भरण्याचे कामाची सुरवात झाली कित्येक लोकांनीं या कामास पैसे दिले त्यांची नावनिशी आह्मी एथें देतों.

१०१ रा. रा. मारुती पाटील आ. मा.
७५ मेसर्स क्लेमींग आणि को.
७५ मेसर्स हारसी आणि सभापती.
५० अकोलें म्युनिसिपाल कामिटी.
५० रा. रा. सदाशीव बाळाजी बुटी.
३० ,, ,, उदेभानजी गंभीरजी.
२५ ,, ,, गंगाधर जोरावरमल साहु.
२५ मे. सिलीमखा साहु.
२५ रा. रा. रंगराव विठ्ठल जहागीरदार.
२५ ,, बाबाजी बोराखडीकर.
२५ ,, गोविंदगीर गोसावी बोरगाव.
२५ लक्ष्मीबाई.
२५ ,, ,, बापु वा हासाजी बावनबीर
२५ ,, ,, रंगराव लक्ष्मण जहागीरदार
२५ ,, बाळकृष्ण परशराम.
२५ ,, केशवराव महिपतराव मलकापुर
२० ,, रामचंद्र नवलाजी पाटील.
२० ,, गुलाबराय गोविंदराम साहु.
१५ ,, भगुलाल ताराचंद साहु.
१५ ,, बिलंदखा साहु बाळापुर.
१५ ,, दवलतराव देशमुख.

पु. चा.

---

मे० बर्न साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर ह्यांच्या जाग्यावर रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर रेसिडेंट साहेबांचे सिरस्तेदार यांस नेमणार ह्मणून वदंता आहे.

वऱ्हाडांत सर्क्युलरें व इतर कागद पत्रांचें भाषांतर करण्याकरितां रा. रा. पुरुषोत्तम नारायण ए. अ. कमिशनर यांस ट्रान्सलेटर नेमणार आहेत. व त्या कामाकरितां ह्मणून त्यांनां निराळा पगारही देण्याचा विचार आहे असें समजतें. प्र. सिं.

---

## वर्तमानसार.

तिबिड सरव्हीत पैकीं जेकब साहेब यांस कायद्यांची इंडेक्स ( अनुक्रमणिका ) करण्याकडे नेमिलें.

खान बहादूर पदमजी पेस्तनजी, रा. ब. कृष्णराव विठ्ठल तिंबुरकर, आणि रा. रा. गणपतराव दामोदर पानशे यांचीं नांवें दक्षिणेच्या फर्स्ट क्लास सरदारांचे पटांत सरकारानें नमुद केलीं आहेत. हें ऐकून आम्हांस संतोष होतो. पारशी ग्रहस्थ फर्स्ट क्लास सरदार झालेले हें पहिलेंच उदाहरण आहे.

पुण्याच्या म्युनिसिप्यालिटीला गेल्यासाली जकातीचें उत्पन्न रुपये ९९४४५ झालें.

जमखंडीकर श्रीमंत आपा साहेब पटवर्धन कारभाऱ्यासह पुण्यास आले आहेत.

बारशी तालुक्याचे चीफ कानस्टेबल मि० अकबर अली यांनीं दंगेखोर हरी रामोशी यास पकडलें याबद्दल जाहिराती प्रमाणें त्यांनां १००० रुपये सरकारानें बक्षिस दिले. त्याचप्रमाणें मि० डोर साहेब कपाशीचे व्यापारी यांनीही या कामीं खटपट केली म्हणून त्यांनां ६०० रुपये मिळाले.

काबुलच्या नदीवर अपघात होऊन सरकारचे जे पुष्कळ लोक मेले त्याबद्दल चौकशी चालू आहे.

व्हाईसराय साहेब गेल्याच्या मागील बुधवारीं सिमल्यास जाऊन पोंचले.

ब्रह्म देशच्या राजानें दरबारांत म्हटलें कीं, इंग्लिश सरकारचीं सर्व मागण्यां कबूल करण्यांत आल्याचें भय आहे, सबब या पुढें त्या संबंधी आपण कांहीं बोलणार नाहीं. बडेबडे प्रधान लोकांस नाखुशी उत्पन्न झाली आहे.

ब्रह्म देशच्या राजानें आणखी एक आपला सावत्र बंधू हाल करून ठार मारल्या असें वर्तमान आलें आहे.

मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब तुंगार डोंगराकडे गेले होते तेथून मुंबईत परत जाऊन पुन्हा कारबाराकडे गेले

झेलुरच्या दुष्काळाचा रिपोर्ट मि० इलियट साहेब यांनीं लिहिलेला स्टेट सेक्रटरी यांस फार मानवला.

फारेस्ट खात्याकडे आणखी ५ आफिसर नेमण्याचें स्टेट सेक्रटरींनीं मंजूर केलें.

हिंदुस्थान सरकारच्या शिफारसीवरून स्टेट सेक्रटरींनीं मंजूर केलें कीं लेफ० जनरल सर एच डेली के सी बी यांनीं आणखी ६ महिने मध्य हिंदुस्थानांतील गवरनर जनरलच्या एजंटचें काम करावें.

हरी रामोशी याचे टोळींतील कोणी वासुदेवराव फडके या नांवाचे ग्रहस्यास पकडून देईल तर त्यास एक हजार रुपये इनाम मिळतील असा सरकारचा ठराव गावगन्नांनि छाप जाहिरातीनें प्रसिद्ध झाल्याचें ऐकतों.

साताऱ्याच्या किल्याचें दुरुस्तीचें काम सुरू झाल्याचें समजतें.

जुन्नर एथील स० जज्जास मारामारी केल्याबद्दल तेथील मामलेदारानीं १५ रुपये दंड केला.

मि० हेनरी गार्डनर विलायतेंतील एक श्रीमान ग्रहस्थ यांनीं आंधळे वगैरे लोकांच्या उपयोगाकरितां एकंदर ३०००००० रुपये अनामत ठेविले आहेत.

पोष्टाच्या पाकिटांस डींक वगैरे कांहीं एक न लावतां हाताच्या एका युकीनें चिकटवींत अशा प्रकारचीं एका नवीन युकीचीं पाकिटें एका ग्रहस्थानें काढलीं आहेत.

चीन देशांतून अशी बातमी कळते कीं, इंग्रज सरकार तिबेटावर स्वारी करणार.

वाचकांस आपले हक्क काय आहेत हें समजावयास लागलें असें म्हटलें असतां चालेल. मि. लाकवुड नावाच्या एका बाईनें अमेरिकेंतील वाशिंग्टन शहराच्या सुप्रीम कोर्टांत बारिस्टरचें काम करण्याची सनद घेतली असें समजतें.

मेसर्स डेतचांप आणि कंपनी यांनीं मद्रासचे गवरनर यांजवर तेथील हायकोर्टांत सुमारें ३० हजार रुपयांची फिर्याद केली आहे. फिर्यादीचें कारण हें कीं, गवरनर साहेबांनीं पारिस एक्झिबिशनास पाठविण्याकरितां एक उत्तम पेटी तयार करण्यास सांगितली होती असें वादीचें म्हणणें होतें व गवरनर साहेबांचें म्हणणें हें कीं, मी अशाविषयीं हुकूम दिल्याचें माझ्या स्मरणांत नाहीं. ही सर्व चूक गवरनर साहेबांच्या मिलिटरी सेक्रटरीस फ्रेंच भाषा अवगत नसल्यामुळें झाली असें स्टेट्समन पत्रावरून समजतें.

मद्रास येथें बर्फ तयार करणारी कंपनी निघाली आहे. या कंपनीचें भांडवल एकंदर ५००००० रुपयांचें आहे असें समजतें.

भाषण करते वेळीं वक्त्याचें भाषण अक्षरशहा तो बोलत असतां उतरून घेण्याचें एक यंत्र एका फ्रेंच मनुष्यानें काढिलें आहे व तें पारिस एथील प्रदर्शनांत ठेविलें होतें.

ने. ओ.

सातार जिल्ह्यांत मांग रामोशी वगैरे वहिमी लोकांत आपल्या जिल्ह्यांतून पर जिल्ह्यांत जाण्याच्या सवबीनें पाटील कुळकर्णी यांचे जिकडून दाखले देतोत; ज्यांत तशा प्रकारचे दाखले पाहिजे असतील त्यांनीं अ० कलेक्टर यांजकडे अर्ज करून कोणत्या ठिकाणीं व काय कामास जावयाचें आहे वगैरे माहिती देऊन दाखले मिळवावेत, अशे विषयीं आमचे डि० माजिस्ट्रेट यांनीं या जिल्ह्यास चोहीकडे हुकूम पाठविले आहेत असें समजतें. आम्हास वाटतें याचप्रमाणें जिल्ह्यांतील जिल्ह्यांत जरी फिरणें असलें तरी त्या लोकांनीं एखाद्या अमलदाराचा दाखला घेतला पाहिजे. पाटील कुळकर्णी यांचा दाखला उपयोगी पडावयाचा नाहीं असा हुकूम फरमाविला असतां हल्लीं पेक्षां गुन्ह्याची संख्या कमी होईल यांत संशय नाहीं.

जादूचा खरा तमाशा करून दाखविणारा म्याह्रेरचा एक खेळ सोलापुरास आला आहे. यांत ज्या ज्या कांहीं जादू होतात त्या त्या पाहून कित्येक चिकित्सक लोकांचीं मनें थक्क होऊन जातात. व तेथें कांहीं कल्पना चालत नाहींत. हा खेळ काल रोजीं सदर बाजारांत होऊन त्यास थोडेच चमत्काराबद्दल ३० रुपये विद्वान लोकांकडून मिळाले. हा खेळ खरोखर पाहून खात्री करून घेण्यासारखा आहे. घड्याळाचा चूर करून पुनः जसेंच तसेंच घड्याळ करून देणें, मनुष्यास गोळी मारून इजा न होणें वगैरे पुष्कळ चमत्कार यांत होतात. क. त.

परशियाचे शहानें फ्रान्स देशांतील एका ग्रहस्थास आपले देशांत धुराचे दिव्यांची सुरवात करण्याकरितां नेलें आहे व रेलवेचा रस्ताही बांधण्याचा त्या सरकारचा विचार असल्याविषयीं स्टेटसमन पत्रांत लिहिलें आहे.

जर्मन देशांत कोण कोणत्या प्रकारचे जिवंत पोष्टांतून पाठवितां येतात हें वाचून आमचे कित्येक वाचकांस आश्चर्य वाटेल. बर्लिन टेगब्लेटवरून कळतें कीं, गेल्या वर्षांत या देशाच्या पोष्ट हपिसांतून चाळीस हजार पेट्यांतून जिवंत प्राणी पाठविले गेले. एकदां एक पेटींत कुत्री भरून ती पोष्टांतून पाठविण्यास आणिली होती परंतु कुत्री अतिशय भोंकूं लागल्यामुळें भयंकर प्राणी म्हणून पोष्टांतून पाठविली गेली नाहींत. नाना प्रकारचे खाण्याचे पक्षी, माकडें, सर्प, व चित्ता इत्यादि प्राणी गुदस्तां या पोष्टांतून पाठविले गेले.

डाका येथील ईस्ट पत्रानें लिहिलें आहे कीं थोड्या दिवसांचे पूर्वी मध्यरात्रीचे सुमारास डाका येथें चंद्र अगदीं रक्त वर्ण दिसत होता व त्यामध्यें शुभ्रपणा अगदीं नव्हता.

लखनौ येथें ब्राह्मो धर्मपंथाअन्वयें एका सुताराचे मुलाबरोबर एका ब्राह्मणाच्या मुलीचा पुनर्विवाह झाला.

भडोच येथें लोकांची स्थिति फार वाईट झाल्या कारणानें मुलें वगैरे गवताचें बी खाव यास लागलीं आहेत.

## सर्पदंशावर उत्तम औषधी.

थोड्या वर्षांपूर्वी भागानगरामध्यें एक रोहिला सरदार होता, तो सर्पाच्या विषावर औषध देण्याविषयीं फार प्रसिद्ध होता. स्वतः तो सर्पविषाची बिलकूल भीति बाळगित नव्हता इतकेंच नाहीं तर त्याचा उलटा क्रम असा असे कीं, कोठें कताही सर्प दिसला किंवा लोकांनीं दाखविला म्हणजे त्याला हातांनीं उचलून मारावा. ज्या बिळामध्यें सर्प आहे असें समजे त्या बिळांत लांबपर्यंत हात घालून सर्प ओढून काढून मारून टाकित असे. सर्प त्याला कडकडून चावत. कधीं कधीं त्याच्या हातांचें मासखंड सर्पांनीं तोडून काढीं. इतका घायाळ झाला तरी त्याला कधींही अपाय झाला नाहीं. एका वनस्पतीची काडी मात्र तो चावीत तोंडांत धरित असे. हीच वनस्पती सर्पदंश झालेल्या मनुष्याला चावायाला देत असे. तेणेंकरून सर्पाचें सर्व विष उतरून नेहमीं गुण येत असत.

चंद्रपुरांत पिलोबा म्हणून एक साधू होता पिलोबाचा आणि वर वर्णिलेल्या रोहिले सरदाराचा भागानगरांत असतांनां फार गाढ स्नेह झाला होता. ज्या वेळेस या दोघाचा वियोग झाला त्यावेळेस त्या सरदारानें दोस्तीचें चिन्ह ण अर्थानें ही वनस्पती स्वसंतोषानें पिलोबाला दाखवून दिली. या दुसऱ्या पुरुषानें सर्प हातानें धरून कधी मारिले नाहींत, आणि आपणाला चावून घेण्याचेही साहस कर्म केलें नाहीं. तथापि सर्पानीं चावलेला मनुष्य ऐकला तर प्रयत्न करून त्यापाशीं जाऊन त्या वनस्पतीच्या काड्या खल्यामध्यें कुटून खायाला देत असे. तेणेंकरून गुण यावा. हें माझेही पाहण्यांत आलें. हें औषध मी कित्येकदां पाहिलें. या साधूपासून ही वनस्पती त्याच्या इच्छेनें समजली. तर इच्यापासून लोकांस पुष्कळ लाभ होणार आहे अशा मनोदयानें ही प्रसिद्ध केली आहे.

हा एक जातीचा मोठा वेल आहे. याचीं पानें विड्याच्या पानाच्या आकारासारखीं असतात तरी विड्याच्या पानापेक्षां मोठीं आणि जाड असून स्पर्श केला तर खरपूस लागतात. विड्याच्या पानाप्रमाणें या पानास जाडेपणा नसतो, या वेलाचें पान साधारणपणें दुधा भोपळ्याच्या पानाइतकें खरपूस लागतें. आकारानें त्यापेक्षां लहान असतें. फूल गुलाबाच्या फुलायेवढें असतें. तथापि त्याचा रंग अगदीं पांढरा असतो, आणि पाकळ्या थोड्या असून जाड असतात. फळी सुपारीयेवढीं असते. रंग पांढरा असतो. वेल बेटा इतका ठोसर असतो. ज्यास्त ठोसर नसतो. वेलाला तीन धारा असतात, यावरून कोणी कोणी याला तिधाऱ्या वेल म्हणतात. तरी तिधारी वेल जो निवडुंग जातीचा असतो तो दुसरा. तो व हा एक नव्हे. लोकांमध्ये ज्यास गाढ वेल म्हणतात तो हाच आहे. एथें दिलेल्या वर्णनावरून वेल ओळखूं येईल या वेलाच्या काड्या वेळच्या लवणी एखाद्या करून जवळ राहूं द्याव्या. सर्पानें चावलेल्या मनुष्यास एक काडी खावयास दिली असतां सर्प कोणत्याही जातीचा असला किंवा कसाही चावला तरी विष बाधत नाहीं, व मनुष्याच्या जिवास अपाय होत नाहीं. या वनस्पतीच्या काड्या फार जुन्या होत तोंपर्यंत ठेवूं नयेत; कारण हा वेल पुष्कळ मिळतो तेव्हां च्यार पांच महिन्यांनीं नवीन काड्या आणून ठेवाव्या हें चांगलें.

ही वनस्पती प्रसिद्ध करण्याचा उद्देश इतकाच आहे कीं, तीपासून सर्पदंशानें संकटामध्यें पडलेल्या लोकांस लाभ व्हावा व तिचे गुण मनुष्यांच्या कार्णी लागावे. तरी वाचकांनीं ही औषधी अवश्य जवळ ठेवावी आणि ज्यांस माहित नाहीं त्यांस सांगावी, बा. प्र.


## जाहिराती.

### महामारी.

हा भयंकर रोग सर्वत्र प्रसिद्ध आहे त्या विषयीं चांगली माहिती देणें व त्यावर वक्तशीर उपाय योजणें फार अवश्यक आहे. म्हणून मिरज संस्थानचे मेडिकल आफिसर रा. रा. त्रिंबक सखाराम सिवलकर एल एम. यांनीं या विषयावर एक लहानसें उत्तम पुस्तक तयार केलेलें वऱ्हाडसमाचा छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत सहा आणे बाहेर गांवीं नेणारास एक आणा अधिक पडेल.

### कुटुंब मंत्री.

शरिरास अपाय घडले असतां तत्काल योजण्याचे उपाय या संबंधी हें उपयुक्त पुस्तक मिसेस रेबिका सिमियन नावाची इस्रायल स्त्री जी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कालेजांत पास झालेली सुज्ञ आहे तिनें नवीन तयार केले त्याची दुसरी आवृत्ती छापून तयार झालेली आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत सहा आणे. बाहेर गांवीं मागणारास एक आणा अधिक पडेल.


हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला. रविवार ता० १८ माहे मे सन १८७९ इसवी अंक. १९



## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |



## जाहिरात

FOR SALE.

A bunglow at Omraotee, formerly known as Colenel Mellets, together with all the outhouses and belongings, cash Rs. 6000.

Apply to propriter Berar Samachar press.

पूर्वीचे इन्स्पेक्टर जनरल मि० मिलेट साहेब यांचा बंगला विकण्याचा आहे त्याची किंमत रुपये ६००० आहे. ज्याला घेण्याचा असेल त्यांनीं वऱ्हाडसमाचारकर्ते खंडेराव बाळाजी फडके अकोलें यांच्याकडे लिहून पाटवावे.


वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख कृष्ण १३ शके १८०१

## कर्नल बुशबी सा० यांचे सन्मानार्थ मलकापूर एथें टोलेजंग सभा.

मे० कर्नल बुशबी साहेब बहादूर डे. क. जिल्हा बुलढाणें हे तीन महिन्यांच्या रजेवर ता० २६ एप्रिल रोजीं विलायतेस जाण्याकरितां मलकापुर मार्गानें मुंबईस रवाना होऊन ता० २८ माहे मजकूर रोजीं मुंबईबंदरीं आगबोटींत बसले, ता० २६ रोजीं मलकापुरीं त्यांचे सन्मानार्थ मोठी सभा भरली होती. सर्व तालुक्यांतील संभावित गृहस्थ पाटील, पांडे, सावकार आणि इतर सुखवासी लोक सभेस आले होते. एकंदर सभासद समूह सुमारें तीनशें होता. शिवाय मे. दस्तुर बहिमनजी जामासजी सी. आय. ई., मि. हीग ... नारायण बावाजी लो. एं ... सरकारी मंडळी ... होता. सभेचा बेत तहशील कचेरींत केला होता. सभास्थान व कचेरीचें पुढचें आंगण फार उत्तम रीतीनें सुशोभित केलें होतें. सभेस सुमारें पावणे सहा वाजतां प्रारंभ झाला. साहेब बहादूर सभागृहांत प्रविष्ट होऊन आसनारूढ झाल्यानंतर एथील इं. म. शाळेचे हेडमास्तर यांणीं सभेचे कामास सुरुवात केली. इंग्रजींत संभाषण करून त्यांणीं साहेबांस कळविलें कीं सर्व तालुक्यांतील लोकांच्या सांगण्यावरून मी इंग्रजींत त्यांचे मनोभाव सूचक अशा चार ओळी लिहिल्या आहेत त्या आपली परवानगी घेऊन वाचतों. असें ह्मणून त्यांणीं लिहून आणलेला इंग्रजी लेख वाचला. त्या नंतर सर्व लोकांच्या समजुतीसाठीं त्याच अर्थाचें त्यांणीं मराठींत संभाषण केलें. तें येणेंप्रमाणेः—

**मेहेरबान जे टी. बुशबी साहेब बहादूर डे० क० जिल्हा बुलढाणें यांस.**

आह्मी या शहरांतलि व तालुक्यांतील आज एथें जमलेले रहिवासी आपल्या स्वदेशीं जाण्याच्या या प्रसंगीं प्रेमयुक्त अंतःकरणानें आपणास भेटण्या करितां आणि सलाम करण्याकरितां आपणापाशीं हजर झालों आहों-

आज आपण तीन महिन्यांच्या रजेवर आपल्या प्रियकर देशीं जात आहां; या प्रसंगीं आपल्या विषयींचे आमच्या अंतःकरणांतील प्रेम शद्बद्वारा प्रकटीभूत व्हावें हें स्वाभाविकच होय,

आजच्या प्रसंगीं आमचें मन सुखदुःखाचे योगें करून द्विधा झालें आहे. अंतःकरणास सुख होण्याचें कारण हें कीं आपण आपले प्रियकर जन्मभूमीला फार दिवसांनीं जात असल्या कारणानें आपल्या अंतःकरणस अत्यंत हर्ष वाटत असेल. तेव्हां आपला तोच आमचा आनंद. आतां तीन महिने पावेतों आपल्या समागमाचा वियोग होणार, यासाठीं दिलगिरी वाटते.

आपणास या जिल्ह्याचे अधिकारावर येऊन सुमार तीन वर्षें झालीं. या काळामध्यें आपण ज्या उत्तम रीतीनें आह्मा सर्वांनां वागविलें तो प्रकार आमच्या अंतःकरणांत इतका दृढीभूत झाला आहे कीं त्याचा आह्मास कधींही विसर पडणार नाहीं. पूर्वीं आपण इतर जिल्ह्यामध्यें असतांनां जी आपली तारीफ आह्मी ऐकत होतों व आपल्या प्रभुत्वाची इच्छा करीत होतों त्या सुखाचा अनुभव गेल्या तीन वर्षांमध्यें आह्मास मिळाला व तें आह्मास निरंतर असो अशी जगन्नियंत्यापाशीं आमची सर्वकाळ प्रार्थना आहे.

आपल्यापाशीं स्तुति करण्यासारखें गुणांचें भांडार एवढें मोठें आहे कीं, अशा थोडक्या वेळांत त्यांचें योग्य रीतीनें वर्णन करणें ह्मणजे दुर्घट आहेः परंतु यथाशक्ति ... यीं आह्मी या प्रसंगीं ... बोललों तर आमच्या कर्त... नास चुकलों असें होईल.

आपण प्रजेच्यां कल्याणाविषयीं आपल्या अंतःकरणांत कळवळा फार बाळगता अशी कोणी प्रजा नाहीं कीं, जिची दाद आपणापाशीं समक्ष लागत नाहीं. आपणास देशभाषा उत्तम रीतीनें अवगत असल्यामुळें प्रजेचें ह्मणणें आपण स्वकर्णेंकरून ऐकून घेतां. आपल्या सर्व न्यायाच्या कामांत दयेचा वास असल्यामुळें त्यांचें काठिण्य कमी होऊन ते नेहमीं स्तुत्य व मान्य असतात. आपण जिल्ह्यांत फिरावयास जातां ते समयीं जे कोणी लोक आपल्या भेटीची इच्छा करितात त्यांस स्वस्थपणें भेट देऊन त्यांच्याशीं हास विनोदपूर्वक भाषण करून त्यांस आपण संतोषवितां, हा आपला स्वभाव फारच तारीफ करण्याजोगा आहे. आपली वृत्ति साधी व आनंदी असल्यामुळें साधारण मनुष्यासही आपणापुढें येण्याची भीति वाटत नाहीं. व असें आहे येणेंकरून सर्वांनां आपणापाशीं योग्य दाद मिळते. उदार अंतःकरण, कोणत्याही प्रकारचे कृपणतेचा अभाव, क्षुद्र गोष्टीकडे दुर्लक्ष्य, निरंतर दुसऱ्याचे कल्याणाची इच्छा, क्षमाशीलता, आणि स्वभावामध्यें आनंदवृत्ति इतक्या गोष्टींच्या योगेंकरून आपली जनामध्यें 'सरदार'' ह्मणून जी कीर्ति आहे ती यथायोग्य आहे. जे जे नेटिव्ह आपणास ओळखतात ते ते आपली ''सरदार'' ही कीर्ति निरंतर गाताहेत. अवल इंग्रजीमध्यें हिंदुस्थानांत जे मोठे मोठे अधिकारी होऊन गेले ते बहुतेक कुलीन आणि महात्मे होते. ते प्रजेशीं मिळून मिसळून वागत व लोकांस संतुष्ट ठेवीत. आणि आपल्या स्वभावाच्या औदार्यैकरून त्यांनीं इतकें उत्तम यश संपादिलें कीं, त्या त्या ठिकाणचे लोक त्यांची अखंड कीर्ति गात आहेत. त्यांच्याच योग्यतेचे आपण आहा आणि या वऱ्हाड प्रांतांत आपली कीर्ति फार वर्षेंपर्यंत गाइली जाईल यांत संशय नाहीं. परंतु वाईट वाटतें कीं, आपणासारखे सरदार अमलदार सध्याच्या राज्यव्यवस्थेमध्यें आमच्या हिश्शास येण्याचीं चिन्हें दिवसानुदिवस दिसत नाहींत.

गुदस्त सालीं आपण या तालुक्यांतील संभावित आणि लायक अशा कित्येक गृहस्थांस खुर्चीच्या मानाचे स्वदस्तुरचे दाखले दिले हे आह्मा लोकांवर आपले फार उपकार आहेत किंबहुना ही आपल्या हातची एक मोठी देणगी मिळाली असें आह्मी समजतों.

आपल्या तीन वर्षांच्या कारकीर्दींतील स... वांहून अत्यंत स्मरणीय आपलें कृत्य ... ह्मणजे सुमारें सहा महिन्यापूर्वीं ... पाठशाळा आणि तत्संबंधी पुस्तकालयें यांच्या निर्वाहार्थ फंड जमविण्याची जी आपण अंतःकरणपूर्वक खटपट केली ती ... या कामीं जशी आपण मेहनत घे... व लोककल्याणार्थ उत्सुकता ... अशी वऱ्हाडांत दुसऱ्या ... ठिकाणीं दृष्टोपत्तीस आली अ... ठिकठिकाणीं सभा भरवून अत्यंत लोकहिताच्या ज्या या गोष्टी त्यांविषयीं स्वतः व्याख्यानद्वारा लोकांस उपदेश करून या गोष्टींचें महत्व आणि उपयोगिता हीं त्यांच्या मनांत इतकीं उत्तम बिंबविलीं कीं या कामांत आपणास मिळालेलें यशच त्याची साक्ष देईल. या कामाकरितां एकट्या या तालुक्यांत ८००० रुपयांची रकम जमा झाली व त्याचा मोठेपणा आपणासच होय.

आतां शेवटीं ईश्वरापाशीं आमचें एवढेंच मागणें आहे कीं तो आपणास स्थलमार्गानें तसेंच जलमार्गानें आपल्या गृहीं सुरक्षितपणें व आनंदांत नेवो जों काळपर्यंत आपण तेथें रहाल तों काळपर्यंत आपणास उत्तम प्रकारचे आरोग्यांत ठेवो. आणि पुनः सुरक्षितपणें आमचे देशांत आणून आपली आमची भेट करवो. आतां आपणापाशीं एवढीच विनंती आहे कीं आपण आजपर्यंत जसा आमच्यावर लोभ केला तसाच निरंतर ठेवावा. व आह्मी जरी आपल्यापासून दूर राहिलों तरी आमचें विस्मरण होऊं नये.

सदरील भाषण आटोपल्यावर मे० बुशबी साहेब यांणीं इंग्रजींत सुरस संभाषण केलें त्यांतील तात्पर्य खालीं लिहिल्या प्रमाणें.

ते ह्मणाले ''आह्मी आज फक्त ३ महिन्यांच्या रजेवर जात आहों, तेव्हां या तालुक्यांतील लोकांनीं जो आज आमच्याकरतां हा मोठा थाट केला याची कांहीं इतकी जरूरी नव्हती. तथापि लोकांनीं कळवळा आणि प्रेम यांचे जे उद्गार प्रदर्शित केले आहेत ते ऐकून आह्माला फार संतोष झाला. दवाखाने व पुस्तकालयें या संबंधानें जमा झालेल्या वर्गणीचें सर्व यश मे. त्रिंबकराव तहशिलदार यांसच योग्य आहे. कारण या कामांत त्यांणीं फारच मेहनत घेतली. धर्माचे कामाकरितां या तालुक्यांत जितकी मोठी वर्गणीची रकम जमा झाली इतकी मोठी रकम धर्मार्थ कारणा निमित्त वऱ्हाडचे कोणतेही भागांत कधीं जमा झालेली नाहीं. मलकापुर तालुक्यांतील लोकांचें औदार्य फारच तारीफ करण्याजोगें आहे. शिगांवास तळें बांधण्याकरितां मोठी रकम जमा झाली आहे खरी पण तिजपासून लोकांच्या स्वतःचाच फायदा आहे. यांत कांहीं मोठेपणा नाहीं. पण मलकापुर तालुक्यांतील लोकांचा पैसा दीनोद्धारार्थ खर्चीं पडला आहे. व त्यापासून गरीब लोकांचें मोठेंच हित होणार आहे. ईश्वरानें मनुष्यास जी संपत्ति दिली आहे तिचा त्याणें केवळ स्वसुखोपभोगार्थ व्यय करावा असें नाहीं, तर त्याचा अंश नेहमीं धर्माकडे गेला पाहिजे. अस्तु. मे. त्रिंबकराव यांचे नांव आह्मी मे. कमिशनर साहेबांकडे लिहून कळविलें आहे. व आह्माला उमेद आहे कीं तेही त्रिंबकराव यांची योग्य तारीफ करतील. तुह्मी आमच्या विषयीं ज्या कल्याणेच्छा प्रदर्शित केल्यात त्यांबद्दल आह्मी तुमचे आभार मानतों आणि तुह्मांस हा शेवटचा सलाम करतो.''

मे. सा.च्या इच्छेवरून त्यांच्या इंग्रजी भाषणाचें तात्पर्य सर्व सभाजनांस पूर्वोक्त मास्तर यांणीं निवेदन केलें. नंतर पानसुपारी, पुष्पाचे हार, गुच्छ, अत्तर गुलाब वगैरे साहेब प्रभृति सर्व मंडळीस वाटून झाल्यावर साहेब उठले आणि सभा बरखास झाली. साहेबांस पॉ

चविण्याकरितां सर्व मंडळी स्टेशनावर गेली होती तेणेंकरून स्टेशन अगदीं भरून गेलें होतें. मे. बुशबी साहेब हे फार योग्य सरदार यांत संशय नाहीं.

## पुण्यास भयंकर आग!

या आठवड्यांत पुण्यावर जो भयंकर प्रसंग आला त्याचें वर्णन करतांनां अंगावर शहारे उभे रहातात. पेशव्यांचे वेळच्या सुमारें ७० वर्षांपूर्वीं बांधलेल्या अति मोलवान मजबूद, व सुबक इमारती विश्रामबागचा वाडा, व बुधवारचा वाडा यांस आगी लागून त्या जमीनदोस्त झाल्या. व त्यांत सरकारचे मोलवान कागदपत्र व पुस्तकें वगैरे होतीं त्या सर्वांची राखरांगोळी झाली. हायस्कूल, इजुकेशनल इन्स्पेक्टर आफिस, बुकडिपो, नेटिव जनरल लायब्ररी, मामलेदारकचेरी, सिटीमाजिस्ट्रेट कचेरी, ३ सबार्डिनेट जडजकचेऱ्या, पोष्ट आफिस, पोलिस कचेरी, घड्याळाचें टावर व फरासखाना इतके कारखाने होते त्या सर्वांची एपस्वरूपी अग्निनारायणानें आहुती घेतली. बुकडिपोंतील ५०००० चीं बुकें, लायब्ररींतील तितकींच किंवा त्याहून अधिक किमतीचीं पुस्तकें, सरकारी सामान कित्येक लाख रुपयांचें, विश्रामबागचा वाडा सात लाखांचा, व बुधवारचा वाडा बारा लाखांचा मिळून सुमार २५ लाख रुपयांहून अधिक नुकसान झालें. बुधवारवाड्यापुढील ढमढेऱ्याचा वाडा व दुसरी सुमार १२ घरें जळालीं हें ऐकून आह्मास अतिशय दुःख वाटतें.

ही आग कोणी हेतुपुरःसर लाविली, व दरवडेखोर जे अलीकडे फार माजले आहेत त्यांची ही कृति असावी असें समजून सरकार त्यांच्या बारीक तपासांत आहे. रामोशाचा प्रधान वासुदेव बळवंत फडके जो फरारी झाला आहे व ज्याला धरण्यासाठीं १००० रुपयांचें बक्षीस सरकारानें लाविलें आहे तो या आठवड्यांत पुण्यांत गुप्त रूपने आला होता, त्यास कित्येक लोक सहाय आहेत, व नामांकित हरी रामोशी चौकशीसाठीं बुधवारचे वाड्यांत कैद होता! हीं कारणें त्यांचा संशय घेण्यास दृढ झालीं आहेत. पण संशयावरून शिपोकडील च्यार इसम पकडले आहेत असें कळतें.

विश्रामबागचे वाड्यास मंगळवारीं ह्मणजे तारीख १३ रोजीं रात्रीं १० वाजतां आग लागली व ती विजविण्याचे खटपटींत लोक गढून गेले आहेत असें पाहून त्याचवेळीं ह्मणजे रात्रौ बारा वाजतां बुधवारचे वाड्यांस दुष्टांनी आग लाविली त्यामुळें अतिशय नुकसान झालें. आगीची बातमी कळतांच लष्करांतून पलटणीचे लोक व आफिसर आले, व माजिस्ट्रेट, पोलिस यांनीं मिळून आग विजविण्याचा प्रयत्न केला तरी दुसरे दिवशीं संध्याकाळ पर्यंत या इमारती जळत होत्या. शहरांतील, लष्करांतील, व रेलवे स्टेशनावरील सर्व बंब या कामीं उपयोगास आणिले होते. व हा इतका प्रयत्न झाला नसता तर सारे पुणें शहर जळून त्याची रांगोळी झाली असती! अरेरे! काय हा ईश्वराचा कोप!

सरकारानें लष्करी लोक शहरांत आणून प्रत्येक कचेरीचे संरक्षणाविषयीं सक्त बंदोबस्त केला आहे व आतांशा रात्रीचे आठ वाजल्यापुढें शहरांत कोणाला रस्त्यानें फिरकूं देत नाहींत. सर्व पुणें शहर गलबलून गेलें आहे. व कोणास कांहीं सुचेनासें झालें आहे.

— पुस्तकांचा नाश, सरकारी सर्व कागद पत्रांचा नाश व अशा अत्युत्तम व मोलवान इमारतींचा नाश, आणि आजची पुण्याची दुःख कारक व भयंकर स्थिति मनांत येऊन आमचा हात हा लेख विस्तृत लिहिण्यास अगदी वाहत नाहीं त्यास उपाय नाहीं!

## दरवडे खोरांच्या खटपटी.

आज तीन चार महिने दक्षिणप्रांतीं रामोशी लोकांनीं धुमाळी मांडली आहे ती मनांत आणली ह्मणजे फार काळजी वाटते. एका आठवड्याचें पत्रांत त्या भागांतील दहा पांच ठिकाणीं दरोडे पडल्याचें वाचलें नाहीं असा आठवडा जात नाहीं. रस्त्यानें प्रवास करणें मोठें कठीण झालें आहे. शिवाय कोणते गावावर काय भयंकर प्रसंग केव्हां येईल याचा नेम नाहींसा झाला आहे. उन्हाळ्याचे महाबळेश्वरीं बहुत साहेब लोक जातात तिकडेही रामोशी लोकांची चाऊ दिसूं लागली आहे. पोलिसांची फिरतीं ठाणीं त्या रस्त्याला ठेविलीं आहेत. शिवाय दुसऱ्या दोन तीन ठिकाणीं पलटणीच्या तुकड्या पाठविल्या आहेत. व कमिशन नेमलें गेलें आहे यावरून सरकार तजविजीस लागलें आहे हें दिसून येतेंच. पण या लुटारू बंडवाल्यांची धाव ही त्यांच्या लेखावर भरवसा ठेविला तर मोठी दिसते. तो प्रकार थोडासा कळवितों.

दरवडेखोर लोकांनीं मुंबई सरकारास एक सूचना लिहिली आहे व ती टाइम्स कर्त्यानें आपल्या वर्तमानपत्रांत छापून सरकारापुढें ठेवावी अशी त्यास विनंती केली आहे. व त्या प्रमाणें त्यांनीं न केल्यास त्यांचे हात तोडले जातील अशी त्यांस दहशत घातली आहे. हा लेख हरी नाईक रामोशी याच्या जुटांतील मंडळीनें लिहिला असें त्यांत लिहिलें आहे. व त्यांत सरकारास सुचविलें आहे कीं धान्याचा सुकाळ असण्याच्या या हंगामांत धान्य इतकें महाग विकूं लागलें आहे कीं जसा खरोखरी दुष्काळच पडला आहे. मोठमोठ्या ज्योतिषशास्त्र वेत्यास आह्मी पुसल्यावरून असें समजलें आहे कीं पुढील सालीं सन १८७७ सालापेक्षाही मोठी भयंकर दुष्काळ पडणार आहे. याजकरितां गरीब रयत, मजूर लोक, व ज्यांस धंदा रोजगार नाहीं तशा लोकांकरितां साऱ्या दक्षिणेंत पब्लिकवर्क्स खात्यांतून सरकारानें रगड कामें काढावीं. लोकांनां धंदा रोजगार दिल्याशिवाय, कर कमी केल्या शिवाय व मोठमोठ्या युरोपियन लोकांचे पगार कमी केल्या शिवाय हे दंगे कमी होणार नाहींत. लोकांस खावयास अन्न नाहींसें झालें आहे तें सरकारानें दिलें पाहिजे. व नेटिव लोकांच्या व्यापाराला उत्तेजन दिलें पाहिजे. तसें न झालें नाहीं तर ही लुटालूट चालूच रहाणार, व हल्लीं नुसत्या नेटिव लोकांसच आमचा त्रास आहे तो पुढें युरोपियन लोकांसही सोसावा लागेल. असें भय घालून पुढें याहून अधिक आणखी लिहिलें आहे कीं, महाबळेश्वरास गवरनर साहेब जातील त्यांचा व दुसऱ्या दोन सरकारी मोठ्या कामदारांचा आह्मांस समाचार घ्यावा लागेल.

या लेखाच्या स्वरूपावरून उघड दिसतें कीं, लिहिणारा हा रामोशी किंवा दरवडेखोर नसावा. किंवा त्याच्या हातून असें कर्म होण्याजोगा तो नसावा. त्याला कांहीं ज्ञानाचा संस्कार आहे व त्याचा गैरउपयोग करून त्यानें लोकांच्या मनावर भयाचा ग्रह उत्पन्न व्हावा अशी इच्छा धारण करून हें लिहिलें असावें. टाइम्सकर्ते ह्मणतात कीं, हा मजकूर दुसऱ्या किती वर्तमानपत्रकर्त्यांस व इतर लोकांस पाठविला आहे त्यांची याद आह्माकडे आलेली आहे. व या पत्राखाली सह्या केल्या आहेत त्या अशा आहेत कीं, ... एच. जाम शंकर हेड क्लार्क व डब्ल्यू. बी. फडके दिवाण निसबत राजा शिवाजी दि सेकंड (दुसरा). आह्मास वाटतें कीं, हें असलें दुष्ट प्रकारचें वैभव मिरविण्यांत व अकलेचा असा खर्च करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. व सरकार या कामीं अधिक लक्ष्य देऊन फार लौकर चांगला बंदोबस्त करून सर्व दरवडेखोरांची खोड मोडील. व या छपून लेखणीचे पोकळ बाण मारणारांचा चांगला समाचार घेईल असें आह्मी इच्छितों.

अलिकडे दरवड्याचे संबंधानें कांहीं कांहीं हकीकती कळल्या आहेत त्या अशा:—

नगर एथील २३ वे काळे पायदळ पलटणींतील सुमारें १५० लोक व पोलिसाकडील कांहीं लोक गेले आठवड्यांत घोडनदीकडे व पारनेर तालुक्याकडे दरोडेखोर लोकांस पकडण्याकरितां गेल्याचें समजतें.

अफवा— खेड तालुक्यांपैकीं नवलाखउंबरें व वडगांव या गावीं सुमारें पांच सहा दिवसांपूर्वीं दरवडेखोर जाऊन लूट केली व तसाच प्रकार देहू व आळंदी एथेंही सुमारें ३।४ दिवसांखालीं झाला ह्मणून एथें बोलवा आहे.

पुण्यापासून १० कोसांवर दावडी गांव आहे तेथें ता० ४ मे रोजीं १५० हत्यारबंद दरोडेखोर लोक जाऊन "आह्मीं बंडखोर लोक पकडून आणिले आहेत व रात्रीं मुक्काम करून पुढें जाणार" अशी थाप देऊन वेशीचा दरवाजा उघडण्यास महारास सांगितलें. तेव्हां महारानें पोलिसास सांगितलें त्यानें येऊन कुलूप उघडलें. तेव्हां बनाऊ शिपाई व कैदी मिळून १० असामी आंत शिरून त्यांनीं वार केले त्या बरोबर पोलिस पळालें. नंतर त्या चोरट्यांनीं घरें रात्री दोन वाजेपर्यंत लुटलीं व त्यांतून बराच माल व दागदागिनें नेले. त्याचा तपशील— १५०० रुपये निळकंठराव पोलिस अधिकारी; २,००० रुपये दादा पुराणिक; २,००० रुपये हरि पुराणिक; ३,००० रुपये एका गुजराचे; ५०० रुपये एका शिंप्याचे; ३००।४०० एका मारवाड्याचे. ह्याप्रमाणें लुटालूट केल्यावर ते लोक निंब गावीं गेले. तेथेंही तशीच लूट केली तिचा तपशील. गुलाब शेट वाणी ५००; आबा साहेब चंद्रचूड २००० रुपये, पाटील ३००; दुसरीं घरें ३००.

गेल्या आठवड्यांत कर्जतेजवळ दिवसा १ मोठा दरोडा पडला व त्यांत पोलिस व दरोडेखोर यांची थोडी चकमक उडून एक दरोडेखोर ठार मारला गेला व एका पोलिसास जखम झाली अशी काल एथें बातमी पसरली आहे.

बार्शीहून कांहीं तांगे स्टेशनावर येत असतां त्यांवर हल्ला करून चोरट्यांनीं १००० रुपयांचा माल नेला.

दरोडेखोरांच्या बंदोबस्ताकरितां ३०० लोक सासवडास व ७५ लोक महाबळेश्वरास पाठविले.

सुमार १५० हत्यारबंद लोकांनीं महाळुंग्यांची पेठ लुटली असें कळतें.

पुण्यापासून ७ कोसांवर लग्नाची बरात चालली असतां भरदोनप्रहरी दरोडेखोरांनीं नवरानवरी व वऱ्हाडी व वऱ्हाडिणी यांस यथेच्छ बुचाडले.

## रामोशाचे दिवाणजी.

वासुदेव बळवंत फडके

या हुद्याचे व या नावाचे नवीन पुरुष उदयास आले आहेत हें आमचे वाचकांस कळलेंच असेल. हा गृहस्थ पुण्यास फिनान्स आफिसांत क्लार्क होता. यास दुर्बुद्धि उत्पन्न होऊन रामोशाचे दरवड्यांत हा सामील झाला आहे. यास इंग्लिश विद्येचा गंध आहे परंतु यानें नीच संगती धरून त्यांत विद्वत्ता पाघळण्याचा प्रयत्न मांडला आहे. व अघोर कर्मे चालविला आहेत. प्रथम सातारा सोलापुर या भागास मोठमोठाल्या लोकांस भयसूचक पत्रें यानें पाठविलीं कीं आह्मा दरवडेखोरास अमुक हजार रुपये पाहिजे आहेत ते पाठवून द्यावे व त्या पत्रांवरून यानें हरी रामोशाचा दिवाण अशा सह्या केल्या आहेत. नंतर त्याला कोणी धरून देईल त्याबद्दल १००० रुपये सरकारांतून बक्षीस मिळतील असा जाहिरनामा प्रसिद्ध झाला. अलीकडे त्यानें मुंबई सरकारास पत्र लिहिलें व तें टाइम्स कर्त्याकडे छापण्यास पाठविलें त्यावर दिवाण निसबत राजे शिवाजी दुसरे अशी सही केली आहे. हिचा हेतू असा दिसतो कीं पहिले हरी रामोशी कैद झाले व नवीन शिवाजी रामोशाच्या तैनातीस हे राहिले. व दरवडे बरेच वळावले ह्मणून त्यानें रामोशास राजा बनावलें पण बिच्याऱ्यास ठाऊक नाहीं कीं राजे व दिवाणजी लवकरच फाशीचे खांबावर लटकतील. अस्तु.

पुण्यास जो आगीचा अनर्थ उडाला त्या प्रसंगींही हे गृहस्थ गुप्तरूपानें पुण्यास आले होते असें एका पत्रांत लिहिलेलें आहे. व दक्षिण प्रांतीं घाट धरून सरकारानें बंदोबस्त चालविला आहे असें पाहून हे कोकणांत उतरले व ठाणें जिल्ह्यांत यांणीं बरीच धामधूम केली. पनवेलीजवळ नेरगावीं ८० लोकांनिशीं गेले आठवड्यांत याणीं जाऊन दरवडा घातला. व उद्या पळस्प्यास जाऊ असें सांगितलें व त्याप्रमाणें दुसरे दिवशीं तेथें गेले. व बडोद्याचे माजी दिवाण बक्षे यांचे एथें त्यांणीं दरवडा घातला, व दीड लाख रुपयांचा विषय नेला. चांदीचीं भांडीं ओझें नेण्याच्या गैरसोयीमुळें टाकून दिलीं. व उद्या नेऊ असें सांगितलें. हा गृहस्थ घोड्यावर होता, बाकीचे लोक पायीं असून त्याजवळ हत्यारें होतीं. घराचे मालकाचे डोक्यावर त्यानीं तरवारीची जखम केली आहे असें समजतें. काय हा अनिवारपणा! याचें फळ त्यास लवकरच मिळेल.

याची बायको जुन्नरास आहे तिनें कोणा बरोबर कांहीं विशेष भाषण करूं नये अशी पोलिसानें खबरदारी ठेविली आहे असें कळतें.

## काबुल प्रकरणाची समाप्ती.

काबुलाकडील युद्धप्रकरण बहुत दिवस चाललें होतें त्याची समाप्ती झाली असें ह्मणण्यास आतां हरकत वाटत नाहीं. मेजर कावनगरी साहेब तहासंबंधी गोष्टी ठरविण्याच्या खटपटींत होते त्या जमून येऊन त्यांचे मनोदयाप्रमाणें अमीर याकुबखान ब्रिटिश सरकारचे छावणींत त्यांस भेटावयास आले. सरकारचे आफिसरांनीं मोठ्या आदरानें त्यांची भेट घेतली. त्यांच्या तंबूपासून सेन्य मैद पावेतों रस्त्यानें दुतर्फा फौजांची रांग लाविली होती. गंदामक एथें ८वे तारखेस त्यांच्या भेटी झाल्या. व भेटीबरोबर २१ तोफांची याकुबखानास सलामी दिली. हिंदुस्थानांत पहिले प्रतीचे राजे निजाम, गायकवाड व शिंदे इत्यादिकांस जो मान आहे तो सरकारानें या काबुलच्या नवीन राजास दिला. आतां तहनामा सही होण्याच्या दिवशीं मोठा समारंभ होईल असें ह्मणतात. याकुबखानानें ब्रिटिश छावणींत येतांच व्हाइसराय साहेबांस तारायंत्र द्वारें आपलें आगमन व भेटीच्या व मानाच्या योगें झालेला संतोष लिहून कळविला. नंतर कावनगरी साहेबांच्या व त्यांच्या राजकीय थाटाच्या भेटी व उलट भेटी झाल्या. कंदाहार व जलालाबाद ब्रिटिश सरकार याकुबखानास परत देणार, कंदाहारास पोलिटिकल एजंट व काबुलास वकील ठेवणार आणि कुरम व खैबर हे घाट रस्ते ब्रिटिश सरकार आपलेकडे ठेवणार असें घाटत असल्याविषयीं वदंता आहे.

अशी बातमी आहे कीं अमीर याकुबखान यानें आफगाणिस्थानांतील बहुतेक सरदार ह्मणजे सुमार ५०० जमा केले. व त्यांची सभा भरवून त्यांस सांगितलें कीं ब्रिटिश सरकारानें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला होता त्यांत स्पष्ट लिहिलें होतें कीं अमीर शेरअली खान मात्र आमचा शत्रु आहे त्या शिवाय दुसरें कोणाशीं आमचें शत्रुत्व नाहीं. ह्मणून आपण कोणी त्यांच्या विरुद्ध असण्याचें कारण नाहीं.

डाक्टर लोकांचीं मतें एकाहून एक भिन्न झालीं तर खरें कोणतें याचा ठराव होणें अवघड आहे. रात्रौ लवकर निजावें व पहाटेस लवकर उठावें हें आ... साधन आहे व तशा प्रकारची एक ह्मण... बहुतकालपर्यंत आपणामध्यें पडलेली आहे; परंतु हल्लीं जर्मनी देशच्या एका डाक्टरानीं तिला हरताळ लाविलें आहे. यांनीं पुष्कळ माहिती मिळवून अ... सिद्ध केलें आहे कीं, जे लोक अधिक का... जगतात त्यांतील बहुतेक जण अधिक रा...पर्यंत निजावयास जात नाहींत. ८० वर्षां... न त्याहून अधिक वृद्ध अशा दहा मनुष्यां... न ८ जण उत्तररात्रपर्यंत जागत असतात ... यामुळे सहजी उशिरानें उठतात. हे डाक्ट... आणखी असेंही ह्मणतात कीं, पहाटेचे तास मनुष्यास शक्ति आणणारे आहेत असें जें ह्मणतात ती केवळ चूक आहे. याच्या उलट या तासांत मनुष्यास अधिक थकवा येतो. त्याचप्रमाणें पहाटेची हवाही कांहीं प्रकारच्या प्रकृतीच्या मनुष्यास संध्याकाळच्या दमसर हवेपेक्षां अधिक नाकारी आहे.

✓ हिंदुस्थान सरकारानें विलायती कापडावरील जकात काढून टाकली हें बरोबर केलें नाहीं, या संबंधानें इकडे व इंग्लंडांत पुष्कळ चर्चा सुरू झाली आहे. विलायतेंतील मुख्य वर्तमानपत्र टाइम्स यांत लिहिलें आहे कीं, हिंदुस्थान केवळ त्याच्याशायरच्या लोकांच्या सोईकरितां आहे असा हिंदुस्थानांत समज होत चालला आहे आणि जकात बंद करण्याला जे हेतु दाखविले आहेत ते चांगले समर्पक से नाहींत. हिंदुस्थान मॅंचेस्टरच्या संबंधानें अडचणींत असतां अशा वेळीं असा प्रकार करणें हें धोक्याचें कृत्य होय.

ब्रह्मदेशांतील रंगूनच्या वर्तमानपत्रांत लिहिलें होतें कीं ब्रह्मदेशचा राजा थिबाया कडून एक वकील प्रोम एथें आला आहे व त्यानें राजाकडून एक पत्र इंग्लिश सरकारास आणिलें आहे कीं तुह्मी आपली फौज आमच्या हद्दीवर जमविली आहे याचें कारण काय? व ती फार लवकर नेऊन काढून न्यावी. व त्याचा पेगु प्रांत इंग्लिश सरकारानें घेतला आहे यावर त्याचा डोळा आहे असे दोन मजकूर प्रसिद्ध झाले होते. परंतु ब्रह्मदेशचे चीफ कमिशनर यांणीं असें लिहून कळविलें आहे कीं, हे दोन्ही मजकूर अगदीं निराधार व केवळ खोटे आहेत.

## वऱ्हाड.

उन्हाळा अधिकाधिक होत आहे व रात्रीं अर्वे येतात तेणेंकरून अतिशय त्रास होत आहे. रोगराई कांहीं नाहीं. व बाहेरूनही कांहीं वार्ता नाहीं ही आनंदाची गोष्ट होय.

गेले सोमवारीं नवीन धर्मशाळेचे पायाचा पहिला दगड बसविण्याचा समारंभ झाला. त्याकरितां रा. ब. नारायण भाई डायरेक्टर यांस विनंती केली होती व ती यांनीं मान्य करून समारंभ साजरा केला. या कामास प्रवर्तक मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. हे होते. यांनीं धर्मशाळेचे मूळ मालकांनीं सर्व प्रकारची मुखत्यारी दिली आहे. यांनीं त्या जागीं एक सुंदर शामियाना देऊन खुर्च्या बाके वगैरे ठेवून बेत फार चांगला ठेविला होता. प्रथम खंडेराव बाळाजी फडके यांनीं थोडें भाषण करून धर्मशाळेची जुनी व नवी माहिती सांगितली, नंतर रा. ब. भाई साहेब यांनीं सुरस व्याख्यान देऊन या कामाच्या प्रवर्तकांचे आभार मानिले. नंतर मे० द० भाई साहेब यांनीं त्यांस समर्पक जबाब देऊन सर्वांस संतोषविलें. नंतर पायाचा दगड रा. ब. नीं आपले हातीं करणी घेऊन बसविला व मंडळींनीं यावर दूध, तांदूळ, मंगल द्रव्य वगैरे घातले. नंतर पानसुपारी अत्तर गुलाब होऊन सभा विसर्जन झाली.

रा. ब. नारायण भाई डायरेक्टर यांस अडीच महिन्यांची रजा मिळाल्याप्रमाणें परवाचे दिवशीं ते ठाणें मुंबईकडे गेले. ८ दिवशीं पुण्यास जातील. त्यांचे जागेवर मि. एटकिन साहेब एथील हायस्कुलाचे हेडमास्तर यांस आफिशियेटिंग नेमिलें. पगारानें ते इन्स्पेक्टरपेक्षां वरिष्ठ आहेत, व नेटिवासच नेमावयाचें, युरोपिनास नेमावयाचें नाहीं असा सरकारचा कांहीं विशेष हेतु नसल्यानें ही नेमणूक झाली असावी. पण कामाचे अनुभवाचे संबंधानें या वेळींही रा. रा. श्रीराम भिकाजी जटार यांची नेमणूक झाली असती तर बरें होतें व लोकांसही अधिक संतोष होता.

शुक्रवारीं म्युनिसिपालिटीची जनरल कमिटी भरली होती. तींत मे० स्यानिटरी कमिशनर साहेब यांचे सूचनेवरून मोऱ्यावगैरे घाण गावांतून काढण्या साठीं २२०० रुपये खर्च करावा अशी वाटाघाट झाली. बजेट मंजूर होऊन आलें ह्मणजे ही गोष्ट अंमलांत येण्याची तजवीज होईल.

गाड्यांवर कर घेण्याचा म्युनिसिप्यालिटीनें सुचविलेला कर आलिशान रेसिडेंट साहेब बहादूर यांजकडून लवकरच मंजूर होऊन येईल असें ह्मणतात.

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील यांचे घरचा दुसरा लग्न समारंभ परवाचे दिवशीं झाला. व्याही जालन्याचे आहेत.

क्या० गनत्राप साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट यांनीं एक महिन्याची रजा घेतली आहे. यांचे काम मि० डेविस साहेब असिस्टंट कमिशनर यांजकडे सोंपविलें आहे.

गेले गुरुवारीं संध्याकाळीं मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांनीं रा. बहादूर नारायण भाई डायरेक्टर रजेवर जाणार ह्मणून त्यांनां एक टोलेजंग मेजवानी दिली. गावांतील प्रतिष्ठित नेटिव गृहस्थही बरेच बोलाविले होते. पात्र सुमार ५० झालें. बेत पंचपक्वान्नाचा फार उत्तम केला होता भोजनोत्तर नृत्य झालें. नंतर भाषणें झालीं व अकरा वाजतां मंडळी घरोघर गेली.

कालच्या शनिवारच्या मागील शनिवारीं एक मुसलमान जादुगीर एथें आला आहे याचा एक खेळ मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांणीं आपले बंगल्यावर करविला. गावांतील प्रतिष्ठित मंडळीही बोलाविली होती. आमच्या कल्पनेप्रमाणें जादुवाल्याच्या मंत्राचा सर्व भ्रमाचा भोपळा बाहेर पडला. आणि मंत्रसामर्थ्यानें पाहिजे तो पदार्थ आणणें या गोष्टीविषयीं याची फटफजिती झाली. याविषयीं आह्मास एक पत्र आलें आहे तें पुढील अंकांत घेऊं.

इलिचपुर शहरचे ७५ रुपयाचे मास्तर रा. रा. भास्कर लक्ष्मण अभ्यंकर यांस बाळापुरची जागा ७५ रु. ची करून तिजवर नेमिलें व तेथील रा. रा. पांडुरंग यास इलिचपुरास नेमिलें.

सांगलीकर नाटककार रा. रा. थोंडो भिकाजी मराठे यांनीं गेल्या बुधवारीं व काल शनिवारीं असे दोन खेळ केले. यांची खेळाची पद्धत चांगली व प्रतिष्ठित आहे आणखी एक दोन खेळ पाहिल्यावर आह्मी याविषयीं विशेष लिहूं.

रा. रा. नानाभाई गणपतराव धैर्यवान ह्मणून मुंबईकर एक गृहस्थ एथें नाटक घेऊन आले आहेत त्यांचाही एथें काल एक खेळ झाला. याविषयीं अगत्य कांहीं लिहिलें पाहिजे होतें पण आज जागा नाहीं.

हिंदुस्थानांतील टपालखात्याच्या अधिकाऱ्यांनीं ठरविलें आहे कीं अकोला, वाशीम, व बुलढाणा या ३ टपाल लाइनी खालीं निजाम सरकारच्या हद्दींतील पोस्टाचे खालीं लिहिलेले गाव आहेत तेथें तारीख १८ माहे मेच्या नंतर रविवारीं रजिष्टरें, पार्सलें, आणि अर्ज घेतले जाणार नाहींत.

पोस्टाचीं गावें.

औरंगाबाद, गंगाखेड, पैठण, मोमिनाबाद, जालना, लातुर, पाथर, पारळी, सालु, मानवट, परभणी, हिंगोली, नांदेड.

एथील हायस्कुलावर रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर यांस आफिशिएटिंग हेड मास्तर नेमिलें व खालील दोन मास्तरांस अनुक्रमानें अलावन्स देऊन मध्यें एक नवीन असिस्टंट मि० एटकीन साहेब परत येईत पर्यंत ठेवणार असें कळतें.

मलकापुर तालुक्यांतील रेल्वे स्टेशनचें विस्वा उर्फ चांदुर हें गाव आगीनें सारें जळालें असें समजतें.

## वर्तमानसार.

कात्रजेजवळ एक ब्राह्मण व त्याची मुलगी वीज पडून मरण पावली.

ब्रह्म देशचा राजा मोठा दारूबाज आहे व तो आपले खिजमतगारासही रगड दारू पाजतो असें वर्तमान आलें आहे.

पुढील महिन्याचे १६ वे तारखेस गुजराथेंत अमदाबाद एथें नेटिव लोकांकरितां वैद्यक शाळा सुरू होणार आहे.

लंकेस कुमारस्वामी या नावाचे बारिस्टर मरण पावले. यांचा जन्म कोलंबो शहरांत झाला होता तेथून हे विलायतेस विद्याभ्यासास गेले होते. यांणीं युरोपियन स्त्रीशीं विवाह केला होता. व हे कायदेकौंसिलांत मेंबर होते.

सुरतेच्या म्युनिसिप्यालिटीनें तेथील सार्वजनिक बगीच्याला १००० रुपयांची वार्षिक देणगी होती ती २००० रुपये केली व हायस्कुलांतील शेतकीच्या क्लासाला ५० रुपये महिना देण्याचें कबूल केलें.

अमदाबादच्या स्त्रियांच्या ट्रेनिंग कालेजावरील सुपरिंटेंडेंट मि० कार्लिट यांनां कोल्हापूरच्या स्त्रियांच्या ट्रेनिंग कालेजावर नेमिलें. पगार दरमहा ३५० रुपये.

दार्जीलिंग पहाडाजवळ गरीब युरोपियन आणि युरेशियन लोकांची वसाहत करण्याची खटपट पुन्हा चालू आहे.

हरिद्वारच्या यात्रेंत महामारीचा उपद्रव अतिशय झाला होता. १५ दिवसांत घाटाखालील मावळे लोक सुमार तीस हजार मेले असा अजमास आहे.

मुंबईस गेल्या पंधरवड्यांत एक पुनर्विवाह झाला. हा दहा वर्षांच्या सुरवातीपासून २२ वा होय. बेळगावच्या मुलीच्या शाळेचे मास्तर दिनकर पंत नावाचे ३६ वर्षांचे वयाचे कोकणस्थ ब्राह्मण यांनीं १८ वर्षांच्या सकुबाई नावाच्या देशस्थ विधवेशीं विवाह हा केला.

तुर्कस्थानाच्या रोमेलिया व बल्गेरिया प्रांतांतून रशियन फौजा तिसरे तारखेस निघण्याची सुरवात झाली. आगष्टच्या तिसऱ्या तारखेपर्यंत सर्व फौजा परत जातील. रशियाच्या बादशहानें सुल्तानास पत्र लिहिलें आहे त्यांत स्नेहसंबंध वृद्धिंगत करण्याविषयीं उत्साह दाखविला आहे.

आफ्रिकेंतील इंग्लिश फौजा झुलू लोकांचे मुलखांत शिरण्याची तयारी झाली, लवकरच आंत शिरतील.

बडोद्याचे रिव्हिन्यु कमिशनर मि० काजी शाबुदीन विलायतेस जाणार व त्याकरितां ते मुंबईस जाऊन दाखल झाले.

बंदोबस्त— पुणें वगैरे जिल्ह्यांत अलीकडे चोरट्यांचा उपद्रव फार माजला होता त्याच्या बंदोबस्ताचा विचार सरकारानें मोठ्या सक्तीनें मनावर घेतला असें दिसतें. गेल्या रविवारीं लष्करी लोकांस बंदोबस्तास जेजुरी जुन्नर, व शिरवळ या ३ ठिकाणांस अनुक्रमें काळ्या पलटणीच्या २ कंपन्या, ३०० लोक व १०० लोक याप्रमाणें युरोपियन सरदारांच्या ताब्यांत देऊन पाठविलें. दंगेखोर लोकांची खरी संख्या तर कळत नाहीं; परंतु चार पांचशे लष्करी लोक प्रत्येकास २०० तोटे देऊन पाठविले यावरून मोठी जबर सक्ती होईल असें दिसतें.

इंदूर एथें धान्याचीं दुकानें.— धान्य अतिशय महाग झालें सबब सरकारांतून ता. ६ माहे मे सन सनमजकूरपासून धान्याचीं दुकानें होणार व बाजारभावापेक्षां एक शेर धान्य ज्यास्त विकणार अशी शहरांत वदंता आहे. ही सरकारी दुकानें झाल्यास गरीब लोकांस फायदेशीर होईल यांत संशय नाहीं.

मुंबई इलाख्यांत एकंदर बडोदें, कच्छ, व कोल्हापुर धरून साठ संस्थानें आहेत. यांच्या मुलखांचें एकंदर क्षेत्रफळ २४५५६ चौरस मैल असून बडोद्यासुद्धां सर्वांचा मिळून २,९२,६९,४१० रुपये वसूल आहे. सिंध प्रांतांतील संस्थानें धरलीं तर ७३०४८ चौरस मैल क्षेत्रफळ असून ८२४९ ७५४ लोकवस्ती आहे आणि ३५६८१२५० रु. एकंदर वसूल आहे असें समजतें.

आफ्रिकेंतील झुलू लोकांचा तंटा लवकर मिटावा या इच्छेनें विलायत सरकारानें सर बार्टल फ्रियर यांस मुलुख घेण्याच्या कामांत पडूं नका; फक्त आमच्या वसाहतीच्या बचावापुरता विचार करा असें सुचविलें.

कंदाहारांत सर्व शांत आहे. त्याच्या आसपासच्या प्रांतांतून इंग्रज सरकाराकडे वसूल बिनतकरार येऊं लागला आहे असें म्हणतात.

१० कोटीचें कर्ज सरकारास काढावयाचें होतें त्याची रकम जमा झाली. लंडनामध्यें ४,४०,७९,००० रु. चें कर्ज मोबदला झालें. हिंदुस्थानांत १,३९,३५,००० रु. रोख दिले व ४,१९,८७,००० मोबदला झाले. एकूण १० कोटीची भरती झाली.

अमेरिकेमध्यें व्यांकेचा म्हणजे मोठा सावकारी धंदा चांगल्या प्रकारें चालतो. व्यांकर्स आल्मेनेक व रजिस्टर यावरून असें कळतें कीं ५०९८ व्यांपैकी म्हणजे लोकांच्या व्यांकी, ८७४ स्टेट म्हणजे सरकारी व्यांकी, ६०१ सेविंग व्यांकी एकूण ६०८५ व्यांकी युनैटेड स्टेटसमध्यें आहेत.

## पत्रव्यवहार.

या सदरांतलील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

### श्री राजेश्वरप्रसन्न.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि० वि० महाराज, अलीकडे आपले वर्तमानपत्रांत राजेश्वर संस्थानाविषयीं कांहीं माहिती आली नाहीं. ती यावी व त्याच्या आरंभलेल्या कामास उदार, धर्मात्मे व पुण्यशील लोकांकडून आणखी मदत मिळावी म्हणून हें प्रकरण लोकांपुढें ठेवण्याची आपण कृपा कराल अशी आशा आहे.

सन १८७४ सालीं अकोल्यांतील मुख्य दैवत श्री राजेश्वर याचे देवालयाची नीट व्यवस्था रहावी, पडझड दुरुस्त व्हावी व नवीन कांहीं कामें व्हावीं या उद्देशानें राजेश्वर कमिटी स्थापन झाली. तिच्या मदतीनें गेल्या सालपर्यंत देवालयाचीं कामें पुष्कळ झालीं. पश्चिमेकडील पाठशाळा नवीन झाली, तिच्यावर माडी झाली, दक्षिणेकडील पाठशाळेवर गच्ची झाली, उत्तरेकडे पाठशाळा करण्याकरितां सर्व सामानाची तयारी झाली, सभामंडपास रंग झाला व चित्रें काढलीं, समया व्हिछाइत वगैरे देवाचें स्वतांचें सामान झालें. दररोज एकादशणीकरितां ब्राह्मण ठेवून त्याला सालीना नेमणूक करून दिली, अशीं किरेक महत्वाचीं कामें झालीं आहेत. तीं गेल्या सालपर्यंतच्या उत्पन्नावर भागलीं. तें उत्पन्न करण्याकरितां किती खटपट करावी लागली व हमेशा या कामीं काया वाचा मनें करून मी किती झटत आहें हें आपण पहाता व राजेश्वर महाराज जाणत आहेत. याहून शतपट अधिक मेहनत पडली व या नाशिवंत देहाचें कांहींही झालें तरी चिंता नाहीं पण संस्थानच्या शोभे साठीं व लोकसुखासाठीं आरंभलेलीं कामें निर्विघ्न तडीस जावींत अशी इच्छा आहे, व त्याप्रमाणें घडवून घेणार प्रभू समर्थ आहे.

आपणास व सर्व लोकांस आज विनंती करण्याचा मोठा प्रसंग येऊन पडला आहे तो खालील हकीकतीवरून आपण जाणाल. राजेश्वर देवालयाला दरवाजा नव्हता तो मोठ्या रस्त्याच्या आंगून सुरेख व भव्य दुमजला काळ्या फत्तराचा बांधावा व त्यावर चौघडा ठेवावा अशी इच्छा मनांत धारण करून आज ९ महिने झाले त्या उद्योगास लागलों. आरंभीं एक पैसाही शिल्केंत नव्हता, पण राजेश्वर महाराजांचे नांवानें बहुतांपाशीं याचना केली यांतून महाराजांनीं ज्यांचे ज्यांचे मनास प्रेरणा केली त्यांकडून थोडी बहुत मदत झाली पण काम हातीं घरलेलें फार मोठें व तें तडीस तर गेलें पाहिजे अशी मनापासून इच्छा मग देवाचें नांवानें कर्ज काढण्यास व स्टांप कागदावर स्वताचे सहीनें आपले जात निसबतीवर उलगडा करण्याचे करार लिहून देण्यास तयार झालों तेणेंकरूनही कांहीं सहाय झालें. पण पुरतें झालें नाहीं म्हणून ही गोष्ट सर्व लोकांस जाहीर करावी. व धर्मात्मे, पुण्यशील व भगवद्भक्त सद्गृहस्थ या कामास अपरिचित असलेले ज्ञात होऊन त्यांनीं आपले औदार्याचा ओघ या कामाकडे अल्पांशीं तरी वाहूं द्यावा म्हणून हा प्रयत्न केला आहे. श्री राजेश्वर महाराज कोणकोणाचे अंतःकरणांत कसा प्रवेश करून त्यांकडून सेवा घेतात हें आतां पाहिलें पाहिजे.

दरवाजाचें काम सुरूं झाल्यापासून त्यास आज नऊ महिन्यांत खर्च ९४६ रुपये लागला. त्यापैकीं उदार लोकांकडून धर्मार्थ देणगीनें ४११ रुपये मिळाले व स्टांपावर रोखे लिहून देऊन कर्ज काढिलें तें २९३॥ हातीं आलें. दरवाजा पुरा होण्यास आणखी एक हजार रुपये पाहिजे आहेत. व लोकांची कर्जें फेडण्यास ५०० रुपये पाहिजे आहेत. मिळून १५०० रुपयांचें सहाय करण्यास जे जे हरीचे लाल पुढें येतील त्यांचे त्यांचे मी यावज्जन्म उपकार मानीन. व त्यांनी सेवा देवाकडे रुजू होण्याविषयीं प्रार्थना करीन. मागें ज्यांणीं सहाय केलें त्यांचीं नांवें लिहितों. तीं कृपा करून आपण प्रसिद्ध करावी.

धर्मार्थ देणग्या.

| | |
|---|---|
| २५ | रा. रा. वेणुगोपाळ मुदलियार. |
| २५ | ,, ,, कृष्णाजी दिनकर सहस्रबुद्धे |
| १०० | ,, ,, तुळजाजी वल्द उत्तराजीतेली |
| ४० | ,, ,, विठोबा पाटील गोरेगावकर. |
| १५ | ,, ,, मुकुंदलाल शोभाराम |
| १२ | ,, ,, उदेभान देशमुख |
| १० | ,, ,, चुणीलाल तेल्हारेकर. |
| ३५ | ,, ,, निंबापा वाणी. |
| २० | ,, ,, दुलाजी पाटील कापशीकर. |
| १० | ,, ,, विष्णु केशव रहातेकर. |
| ९ | ,, ,, जोतीबा कुणबी. |
| ५ | ,, ,, माधवराव कृष्ण कापशीकर. |
| ५ | ,, ,, सखाराम मोरेश्वर खजिनदार |
| ५ | ,, ,, निळकंठराव नारायण भट. |
| ५ | ,, ,, निळकंठ शंकरराव विठुळकर. |
| ५ | ,, ,, आबा पटवी. |
| ८५ | चिल्हर थोडथोडी रकम किरेक लोकांनीं दिली ती. |
| ४११ | |

कर्ज.

| | |
|---|---|
| ५० | रा. रा. अण्णा साहेब जहागिरदार. |
| ५० | ,, ,, गोपाळ महादेव भिडे |
| ५० | ,, ,, सदाशिव नारायण वकील ना. |
| ५० | ,, ,, नथो लक्ष्मण वकील. |
| ३३॥ | ,, ,, शिवाजी इंद्राजी वटवाडीकर. ५० रु. चे रोख्यापैकीं. |
| २५ | ,, ,, सखाराम दत्तात्रय तहशिलदार. ५० रु. चे रोख्यापैकीं |
| २५ | ,, ,, जयराम पाटील माझोडकर |
| १० | ,, ,, लक्ष्मण भास्कर वकील ५० रुपयांचे कबुलायतीपैकीं. |
| | * आबाजी खंडेराव वकील ५० रुपये कबुल केलेले देणार आहेत. |
| २९३॥ | |

येणेंप्रमाणें हकीकत आहे. व उदार लोकांस एवढीच विनंती आहे कीं त्यांनीं सहाय देऊन दरवाजाचें काम तडीस न्यावें. धर्मार्थ रकमा देण्यात अगर कर्ज रोखे घेऊन पन्नास पन्नास रुपये देण्यास ते कबूल असतील तर दस्तैवज देण्यास मी सिद्ध आहे. श्री राजेश्वर फंडांतून त्यांची रकम वसूल न झाल्यास मी आपले जातीवर देण्यास सिद्ध आहे. तर ही हकीकत ऐकून एथील व बाहेरचे सद्गृहस्थ देवाचे कामास अवश्य सहाय देतील व सिद्धिदाता परमेश्वर त्यांस तसें करण्यास बुद्धी देऊन हें आरंभलेलें काम तडीस नेऊन अकोले शहराची वाणी राखो व चिरकालिक हें कृत्य होऊन आश्रय दात्यांचे नाव होवो. म्हणून पुन्हाही त्यास पदर पसरून विनंती करीत आहे.

कळावें ही विनंती अकोला ता० १९ मे सन १८७९ इ.

घोंडो नारायण वेंडर वर्ड्वाटदार
निसवत राजेश्वर कमिटी.

## जाहिरखबर.

सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं, मौजे डोल्हारी तालुके दारव्हा एथील सर्वे नंबर ६२ चें शेत रामा गोंड याचे नांवें असून खालीं सही करणारापाशीं गहाण असून रामा याजवर निवाडा मिळविलेला आहे. यास्तव ही सुटीची संधी पाहून कोणत्याही रीतीनें तें शेत कोणी घेऊं नये. व रामानेंही देऊं नये. या विरुद्ध कोणी वर्तल्यास गहाणाचा बोजा जिकडे शेत जाईल तिकडे रहाणार आहे. कळावें, तारीख ४ माहे मे सन १८७९ इसवी.

( सही ) व्यंकटी वल्द दत्तबा केकाण
रहाणार डोल्हारी प्रगणे
दारव्हा निशाणी रेघ

## नोटिस

कमरुदीन मुल्ला तयबअली बोहरी दुकान अकोला यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे दुकानाची खातेबाकी व आमचे दुकान तुम्ही भाड्यानें घेतलें त्याबदल भाडें असें एकंदर तुम्हाकडे घेणें असून तुम्ही बरेचवर चाळविता व आमचे दुकान आम्हीं पुष्कळ दिवस झाले तुम्हास खालीं करून देण्यास सांगितलें असतां तेंही देत नाहीं करितां या नोटिसीनें कळविलें आहे तर खातेबाकीचे रुपयांस आज तारखेपासून चार रुपये शेकड्याप्रमाणें व्याज घेतलें जाईल व आजपासून आठ दिवसांत दुकान खालीं करून न दिल्यास दरमहा दहा रुपयेप्रमाणें भाडें तुम्हास द्यावें लागेल याप्रमाणें एक महिन्याचे आंत निकाल न केल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल व या नोटिसीसुद्धां एकंदर खर्च वर लिहिल्याप्रमाणें रकमेसहित व दुकानासहित दावा केला जाईल. कळावें तारीख ७ माहे मे सन १८७९ इ.

( सही ) एकोबा सखाराम सोनार
रहाणार अकोला
दस्तुर खुद.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला. रविवार ता० २५ माहे मे सन १८७९ इसवी अंक. २०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचें अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसाबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

FOR SALE.

A bunglow at Omraotee, formerly known as Colenel Mellets, together with all the outhouses and belongings, cash Rs. 6000.

Apply to propriter Berar Samachar press.

पूर्वीचे इन्स्पेक्टर जनरल मि० मिलेट साहेब यांचा बंगला विकण्याचा आहे त्याची किंमत रुपये ६००० आहे. ज्याला घेण्याचा असेल त्यांनीं वऱ्हाडसमाचारकर्ते खंडेराव बाळाजी फडके अकोलें यांच्याकडे लिहून पाठवावें.

## नोटिसा.

सयद बिरामखा वल्लद अशरबखाजी, मनबरखाजी बाबुखाजी व रसूलखाजी व. यासिनखाजी रहाणार बाळापुर जिल्हे अकोलें यासी खालीं सही करणार नोटिस देतो असा कीं, कसबे बाळापुर एथें इसबखा वल्लद अशरबखाजी मोमीण याचें घर धाब्याचें व माडी कवेलूची आहे. त्यांणीं मजपासून २०० रुपये कर्ज घेऊन रुपयांऐवजी तारणगहाणखत तारीख २८ माहे जून सन १८७१ इसवी रोजीं करून दिलें त्यांत अशी शर्त आहे कीं तीन वर्षांचे आंत तुमचे रुपयांची आदाई करून देऊं न देऊं तर दोन रुपये शेकड्याप्रमाणें पुढें राहिल्यास व्याज देऊं. अशी शर्त लिहून देऊन घर आमचे ताब्यांत दिलें. त्यांत आजपावेतों वसूल वगैरे न देतां तो इसम सुमार दोन तीन वर्षांपूर्वी मयत झाल्या करितां त्याबद्दल आह्मीं तुह्मास पांच चार वेळां ह्मटलें कीं, व्याजासुद्धां रुपये आमचे दोनशे देऊन घर तुह्मी आपले सोडून घ्यावें. तेंही तुह्मी करित नाहीं. तेव्हां या नोटिशीचे द्वारानें असें कळवितों कीं, मजला लक्ष्मण गोविंद अकोलेंकर यांचें देणें आहे त्यांत हें घर त्यांजला विकुं शकतो. पुढें तुह्मी त्याजवर वारसा करतां किंवा तुमचे भाऊ बिरादर कोणीं वारसा करतील तर चालणार नाहीं. सबब ही नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत तुह्मी किंवा तुमचे भाऊबंद वगैरे कोणीं विचार करून आमचे रुपये व्याजासुद्धां देऊन घर आमचे ताब्यांतून तुह्मी सोडवून घ्यावें नाहीं तर पंध्रा दिवसां नंतर लक्ष्मण गोविंद याजला मी खरीदी करून देईन. पुढें मजवर कोणतेच गोष्टीची जबाबदारी रहाणार नाहीं. कळावें. तारीख १२ माहे मे सन १८७९ इसवी.

(सही) शेखलाल वल्लद लालमहमद मोमीण रहाणार ताजनापेठ अकोलें याचे हातची निशाणी तराजू

नोटिस.

तुळसीनाटण शेट सुगंधी दुकान जळगाव यास खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें असें कळवितों कीं, बापू वल्लद देवाजी पाटीळ रहाणार जळगाव याणीं तुह्मास तारीख १७ मे सन १८७१ इसवी रोजीं दस्तैवज रुपये ७९९ चा करून दिला आहे त्या तारखेपासून आजतारखेपर्यंत एकंदर हिशेब तुमचे दुकानचा आह्मी कित्येक वेळ दाखविण्याविषयीं तुह्मास ह्मटलें असतां तुह्मी आमचे ऐकत नाहीं व हिशेब दाखवित नाहीं सबब तुमचे दुकानची सालबंदी १८३५ सालची देणें आहे ती आम्ही तुळशीराम रामचंद्र साहू दुकान जळगाव यांचे दुकांनीं जमा केली आहे तरी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सन १८७१ इसवी ते १८७८ इसवी अखेर आठ वर्षांचा हिशेब बापू वल्लद देवाजी पाटील याचे नावचा आह्मास दाखवावा. तसें तुह्माकडून जर झालें नाहीं तर आम्ही दिवाणी कोर्टांत तुह्मावर दावा करूं. सालबंदी जमा झाल्या तारखेपासून तुह्मी आह्मावर फिर्याद केल्यास विनाकारण कोर्टखर्च करण्यास तुह्मी लावल्याबद्दल आम्ही तुह्मावर फिर्याद करूं. आह्मास पक्कें ठाऊक आहे कीं तुह्मास सदरचे दस्तैवजाचे तारखेपासून रोख रुपये १२०० दिले गेले शिवाय तुह्मी आमचे बापापासून सालबंदी १७०० चीही लिहून घेतली आहे तर या मानोंन आठ वर्षांचें आंत एकंदर २९०० रुपये तुह्मास पावले सबब जमा खर्च तुमचे दुकानी झाला असेल तो तुह्मी आह्मास दाखवावा तसें झालें नाहीं तर तुह्मावर फौजदारींत कपटानें दस्तैवज करून घेतल्याबद्दल फिर्याद केली जाईल. कळावें ता. १८।५।७९

( सही ) माधोबा बापूजी वस्ती सजनपुर दस्तुर खुद

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## जादुगिरी

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज, गेल्या आठवड्यांत या विषयावर पुढील पत्रीं कांहीं लिहिण्याचें आपण अभिवचन दिलें आहे. त्यास त्या कामीं माझी अल्प सेवा उपयोगास आल्यास पहावी.

आपण धाडसपणानें मंत्र व जादूगिरी खोटी आहे असें पुष्कळ दिवस ह्मणत आहां. व एके वेळीं आपण शेंदूरणीचा भगवान मंत्री यांस १०० रुपये मंत्र चमत्काराबद्दल हरावयासही कबूल झाला होता याचें मला आजपर्यंत फार आश्चर्य वाटत होतें. मला वाटे कीं एकादे वेळ आपण हराल व मंत्रांची निंदा करावयाचा अभिमान सोडून द्याल. फार कशाला ? गेले आठवड्यातच ज्या गौडबंगाली गृहस्थानें मे० दस्तुर बहिमनजी साहेब. सी. आय. ई. यांजकडे चमत्कार केले. त्याच्या बोलण्याच्या ऐटीवरून वगैरे मला वाटत होतें व माझे कित्येक मित्र ह्मणत ही होते कीं हे मांत्रिक या निंदकांची खोड मोडून यांपासून पैसे हबकणार पण शेवटीं चमत्कार होऊन त्या मांत्रिकाचा सर्व लोकांत उपहास झाला व आपले शद्बास खरेपणा आला हें पाहून मला संतोष होतो.

या मनुष्यानें गारुडी लोक हातचलाखीचे चमत्कार करितात तसे कित्येक केले त्याजबद्दल विशेष सांगावयाचें नाहीं. कारण ते रस्तोरस्तीं सर्वांचें पहाण्यांत येतात. सबब फळफळावळ, मेवामिठाई वगैरे त्यानें काढिली व तशीं काढणें हें मंत्र सामर्थ्यांचें काम होय असा पुष्कळांचा समज आहे सबब हें कसें झालें तें सांगतों.

या गृहस्थानें घरचे यजमानाकडून एक तबक व एक चादर मागून घेतली. नंतर तबकांत एक उभे लाकूड ठेवून त्यावर ती चादर तंबुप्रमाणें टाकिली व तबक आच्छादून घेतलें नंतर पहाणोरे लोकांपैकीं एका मनुष्यास आपले जवळ बोलाविलें व तबकांत जिन्नस येत जातील ते पहा ह्मणून सांगितलें दोघेजण आमने सामने बसले व तबकांत एक लाकडी गोटी प्रथम टाकली, आणि छों छूं करून दोन्ही हात मोकळे आहेत असें लोकांस दाखवून ते चादरीचे आंत घातले व जणु काय तबकांत पदार्थ नवीन उत्पन्न करीत आहे असें भासविलें. नंतर त्या दुसऱ्या मनुष्यास ह्मणाला पहा तबकांत काय आलें? त्यानें उघडून पाहून कांहीं नाहीं ह्मणून सांगितलें. पुन्हा उघडे हात त्या वस्त्रांत गालून पहिले प्रमाणेंच खटपट केली व पुन्हा त्या मनुष्याकडून पाहविलें व पुन्हा कांहीं नाहीं असें ह्मणाला, नंतर तिसऱ्यानें असें करितांच त्या तबकांतून ७।८ आंबे व एक मोठा थोरला कोबीचा गड्डा निघाला. तबक ओतून ठेविलें. व पुन्हा दोन वेळ पदार्थ आणण्याची खटपट करीत आहे असें दाखऊन तबकांत कांहीं आलें नाहीं असेंही त्या मनुष्याकडून लोकांस दाखविलें आणि तिसऱ्यानें दोन तीन शेर सोलीव बदाम काढिले. व तिसऱ्यानें ही पूर्ववत खटपट करून तबक भरून मेवा काढिला. आणि तो शोधक व भोळसट लोकांस मोठा अचंबा वाटविला व त्यांतून कोणी कोणी अद्भुत मंत्रसामर्थ्य, अद्भुत मंत्रसामर्थ्य असेंही ह्मणूं लागलें. पण शेवटचे वेळीं भाईसाहेबांचे पदरचे नोकर लोकांपैकींच कोणी त्राणाक्ष होते व ते त्याची ती कृति बारीक नजरेनें पहात होते त्यांनीं त्याचा बीर मंत्र ताडला व पुढें काढावयाच्या मालाच्या तोंडबांधलेल्या पिशव्या व गाठोडीं मुद्देमाल पकडलीं त्यावरून मांत्रिक बुवांचें एकदम सोनपितळ बाहेर पडले व ते गयावया करूं लागले व पुढें पदार्थ काढणें त्यांनीं बंद केले.

आतां आपले वाचकांस त्यांतील मुख्य बीज मी कळवितों कीं, हे पदार्थ काढण्याचें काम मंत्राचें बिलकूल नाहीं. फक्त हिकमतीचें व हात चलाखीचें आहे. जादूवाला तबकात पदार्थ आला पहा असें ह्मणून एक दोन वेळां त्या आपणापुढें आणून बसविलेल्या मनुष्यास फसवी; व त्यावेळीं जिन्नस काय आला, अगर आला किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं पुढें बसविलेल्या मनुष्याकडे व त्याच्या तबक उघडें करण्याच्या व पहाण्याच्या खटपटीकडे लोकांची नजर चित्रासारखी वेधून जाई, इतक्या अवकाशांत हें मांत्रीक आपले एका बाजूस युक्तीनें छपवून ठेविलेल्या गाठोड्या व पिशव्या पैकीं एकादी हळूंच सरकवून मोठ्या शिताफीनें चादरींत आणून घेईत त्याकडे कोणाचें लक्ष्य जात नसे व मग लागलीच पदार्थांचा ढीग तबकांत येई. कांहीं वेळा मंत्रिराज चादरीच्या आंत पिशव्या रित्या करून तबकांत जिन्नस रिचवीत आहेत असें आवाजावरून व कृतीवरून समजत असे. व तिसरे चवथे वेळीं तर त्यास तसें करतांनां प्रेक्षकांनीं धरून दिलें. व त्यानें छपवून आंगाशी ठेविलेले कांहीं पदार्थांचीं बोचकीं दाखवून दिलीं. तेव्हां यांत मंत्रसामर्थ्य काय आहे तें सर्व लोकांनीं पहावें. व आपले पूर्वीपासूनचे शद्बावर विश्वास ठेवावा. आणि पोकळ भ्रम सोडून द्यावा अशी माझी त्यांस शिफारस आहे. कळावें हे विनंती.

एक प्रेक्षक

## नाटकें.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. महाराज, नाटकाच्या संबंधानें चार ओळी लिहिल्या आहेत या आपणास योग्य वाटल्यास स्थळ देण्याची कृपा करावी.

सुमार तीस वर्षांपूर्वी आपले देशांत महाराष्ट्र भाषेंत नाटक ह्मणून काय तें ठाऊक नव्हतें. पुढें कैलासवासी चिंतामणराव आपा साहेब पटवर्धन सांगलीकर यांचे सहायानें रा. रा. विष्णु पंत भावे यांनीं महाराष्ट्र भाषेंत कविता करून व त्यांनां भाषणें जोडून आख्यानें बसविलीं. आणि रंगभूमीवर त्यांचे प्रयोग करण्याची सुरवात केली. ह्मणून ते व्यास वाल्मीकासारखे महाराष्ट्र नाटकाचे आद्य कवी होत, व तो मान बहुत नाटकाचार्यांकडून त्यांनां मिळत असतो. ही कीर्ति व हें यश त्यांनां चांगलें मिळालें. दहा पांच वर्षे विष्णु पंतांनीं नाटकें देशावरावर फिरवून नंतर तो धंदा सोडला. नंतर त्यांच्या पात्रांतील

किल्येक लोकांनीं दुसरीं पात्रें मिळवून किल्येक वेगवेगळीं नाटकें केलीं. व ही तऱ्हा लोकरंजनास व स्वतांच्या निर्वाहास बरीच अनुकूळ आहे असें पाहून दुसऱ्याही किल्येक गावच्या लोकांनीं नाटकें केलीं. त्यांची एकंदर संख्या आज मितीस किती आहे हें बरोबर मला जरी माहित नाहीं; तरी तीं पन्नासापून कमी नसतील असें ह्मणण्यास मला कांहीं हरकत वाटत नाहीं.

पूर्वी देवादिकांचीं चरित्रें कीर्तनाचे व पुराणाचे योगानें आह्मास ठाऊक होतीं. तेणेंकरून त्यांवर श्रध्धा बसण्यापेक्षां प्रत्यक्ष देवाचीं रूपें घेऊन येणाऱ्या पात्रांस पाहून अधिक बसेल असें वाटत होतें. आणि खरेंच आहे कीं, निर्गुणाची ओळख होण्यास प्रथम सगुण उपासना केली पाहिजे ह्मणजे मार्ग होतो हें एक, आणि नुसत्या ऐतिहासिक लेखापेक्षां गोष्टीचा प्रत्यक्षानुभव मनुष्यास वस्तूचें यथातथ्य ज्ञान देतो ह्मणून राम कृष्ण अवतारादिकांचीं नाटकें होऊं लागलीं. त्यांच्या प्रत्यक्ष मूर्ति डोळ्यापुढें दिसूं लागल्या. ते रावण कंसादि दुष्टांचा वध कसा करितात तें प्रत्यक्ष दिसूं लागलें. परमेश्वर भक्तांचें साह्य कसें कारितो तें अधिक व्यक्ततेनें लक्षांत येऊं लागलें. यावरून नाटकें हीं मोठीं सुधारणेचीं, धर्माभिमानाचीं व भक्तिमार्गाचीं साधनें आहेत असें व्हावें पण दुर्दैवानें तसें न होतां तीं भलत्याच थरावर गेलीं हें पाहून वाईट वाटतें.

विष्णुदास कवीनें रंगभूमीवर नाटकें आणिल्या नंतर बऱ्याच वर्षांनीं संस्कृत भाषेंतील उत्तम नाटकग्रंथांचीं मराठींत भाषांतरें होण्यास सुरवात झाली. आह्मास आठवतें कीं, कै० परशुरामपंत तात्या गोडबोले यांणीं सन १८६१ सालीं वेणीसंहार या नाटकाचें भाषांतर केलें त्यापूर्वी मराठी भाषेंत नाटकाचें पुस्तक नव्हतें. हें नाटक इतकें उत्तम व रसाळ झालें आहे कीं, दहा वेळां वाचलें तरी पुन्हा वाचावें असें वाटतें. त्याची भाषाप्रौढी, काव्यचातुर्य, संविधानक इत्यादिकांनीं विष्णुदासाचे व त्या वेळीं झालिले दुसरे नाटकांस फिकें केलें. विद्वान् व गुणज्ञ लोकांस वाटूं लागलें कीं रंगभूमीवर नाटकें पहावीं तर हीं धांगडधिंग्याचीं पहाण्यापेक्षां प्रासादिक कवींच्या ग्रंथांचीं पहावीं. पुढें आजपर्यंत तशीं संस्कृतांचीं सुंदर भाषांतरें, नामांकित इंग्लिश भाषेंतील शेकूस्पियरच्या नाटकाचीं भाषांतरें व मराठींतच स्वकपोलकल्पित कांहीं नाटकें विद्वानांनीं केलीं आहेत त्यांची संख्या १० | १९ आमचे पहाण्यांत आहे. तीं नाटकेंही किल्येक नाटकवाले तयार करून रंगभूमीवर त्याचे प्रयोग करूं लागले आहेत त्यामुळें त्यांच्या नाटकाची योग्यता वाढत आहे. सर्वच नाटकवाल्यास हीं साधत नाहींत कारण त्यांमध्यें सुगर मनुष्यांचा भरणा कमी असतो.

अलीकडच्या काळीं बहुत नाटकें गवाळ व पैशापासरी झाल्यानें त्यांवर भोळे भाविकांची धर्मसंबंधानें जी भक्तिरूप श्रद्धा होती ती राहिली नाहीं. व कांहीं नाटकें केवळ तमाशाच्या दर्जावर जाऊन नाटक शद्बाची अवहेळणा करीत आहेत. व त्यामुळें विद्वान लोक त्यांकडे लक्ष देण्याची टाळाटाळ करूं लागले आहेत. हें त्यांस योग्य बक्षीस होय. पण जन त्रिविध आहे ह्मणून तमल्याचेही शोकी त्यानां आढळतात व त्यांची रोजी चालू आहे. एक थेटा मनुष्य कांहीं दिवसां मागें इकडे नाटक घेऊन आला होता. त्याचीं पात्रें ह्मटली ह्मणजे एक तो स्वतां, एक त्याचे प्रिय पात्र ( स्त्री, ) एक गडी, व एक दोन मनुष्यें. अहाहा! केवढा हा नाटकाचा संच! त्यानें नाटक मांडिलें ह्मणजे गांवांतील एक दोन तरुण टवाळ लोक संगें घेईत व तीं स्त्री देवी वगैरे झाली ह्मणजे यांनीं राक्षस वगैरे होऊन शोभावें ! वाः ! कांय हा भक्तिरस ! आणि कायही नाटकाची थोरवी !

कांहीं नाटकांत आतांशा स्त्रिया मिसळूं लागलें आहेत. पहिल्या प्रथम नाटकें झालीं तेव्हां चांगलीं होतकरू व सुखी मनुष्यांची मुलें नाटकांत जाऊं लागलीं होतीं. व नाटकापासून लोकांचा खराबा आहे असें मत झालें होतें. पण अलीकडे तो बोभाट फारसा नाहीं. तथापि आतां स्त्रिया नाटकांत नाचावयास येऊं लगल्या. व नुकत्याच एथें येऊन गेलेल्या एका नाटकांत एका सभ्य व सुशील मास्तराची बायको सोंग घेऊन नाचत असल्याचें मी पाहिलें. गेल्या आठवड्यांत रा. रा. नानाभाई धैर्यवान मुंबईकर यांनीं नाटकें केलीं त्यांतही एक तरुण सुंदर स्त्री नाचत होती व दुसऱ्याही एक दोन होत्या तेव्हां अशा नाटकांनां उत्तेजन देणें मोठें जबाबदारीचें किंबहुना धोक्याचें आहे असें मला वाटतें व सर्वांस असेंच वाटेल अशी माझी खात्री आहे.

प्रस्तुत वऱ्हाडांत दोन तीन नाटकें आलीं आहेत. तीं व मागें येऊन गेलेलें इचलकरंजीकरांचें नाटक यांच्या गुणसंबंधानें कांहीं लिहावें ह्मणून मी हें पत्र आरंभिलें पण प्रस्तावनेंतच माझा पुष्कळ वेळ गेला व आपले कागदाचा अमोलिक भाग जाईल ह्मणून तेवढा विच्यार आतां पुढें लिहीन असें कबूल करून आपली आतां रजा घेतों. कळावें हे विनंती

एक
नाटकें पाहणारा.

---

वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ शुध्ध ४ शके १८०१

---

## पुण्याकडील आगी व दरवडे.

पेशव्यांच्या दोन उत्तम वाड्यांस आग लागून ते जमीनदोस्त झाले या विषयींचा दुःखकारक मजकूर गेल्या आठवड्यांत आह्मी लिहिला आहे तो वाचकांचे पहाण्यांत आलाच असेल- त्यांनां आग लावण्याचें यश ब्राह्मण कुळांत जन्म पावलेले तेथील सरकारी बुकडिपोकीपरचे चिरंजीव केशव कृष्ण रानडे यांनीं घेतलें असें समजण्यांत आलें आहे- दरवडेखोरांतील वासुदेव बळवंत फडके याच्या साथीदारांनीं त्याला फितविलें व दागिने वगैरे लांच देऊन त्याकडून केरोसिन तेलाचीं पिपें वगैरे आणवून ते तिघे इसम व केशवराव चवथे यांनीं स्वतां जाऊन दोन्ही ठिकाणीं आग लावली असें केशवरावानें कबूल केलें आहे व त्याची चौकशी माजिस्त्रेटापुढें होऊन त्यास सेशन कमीट केलें आहे. त्याबरोबर त्याचा बाप व शिपाई हेही आरोपी आहेत. माजिस्त्रिटापुढें हें काम चालू असतां दरवाजे बंद होते असेंही समजलें आहे. या कामांतील आणखी पुढारी लोक सापडले जावे ह्मणून सरकारानें त्यांकरितां ५००० रुपयांचा जाहिरनामा लाविला आहे तेव्हां कोण कोण निदर्शनास येतात ते पहावें-

पेशव्यांचे वाड्याचे तोडीचाच श्रीमंती वाडा आदितवार पेठेंत कै. हरिपंत तात्या फडके यांचा आहे. त्यालाही आग लावण्याचा १६ वे तारखेस प्रयत्न झाला होता पण नशीबाची गोष्ट कीं, वाड्यानें पेट घेण्यापूर्वी जळता काकडा कोणाचे दृष्टीस पडला व ते अरिष्ट टळलें. शनवार पेठेंत होळकराचा एक मोठा वाडा आहे त्याच्याही एका भागास गेल्या आठवड्यांत आग लागली होती पण ती लवकर विजली. घातक लोकांनीं फाय हा दुष्टपणा मांडिला आहे याजबद्दल आह्मांस अत्यंत वाईट वाटतें. या पासून त्यांस काडीमात्र फायदा न होतां लोकांचें नुकसान व अखेरीस त्यांचा सर्वस्वी नाश होणार आहे यांत संशय नाहीं.

दरवडेखोर अजून जोरावर आहेत' अलिबागचे श्री. रा. भाऊसाहेब बिवलकर व पुण्याचे श्री- रा. भाऊसाहेब नातू यांस चोर त्यांनीं पत्रें पाठवून दहा दहा हजार रुपये मागितले व ते न दिल्यास आह्मी तुमचे घरावर आग घालू व तुमचा नाश करू अशी त्यांस दहशत दिली आहे. त्यांनीं तीं पत्रें सरकारास पहाण्यास पाठविलीं आहेत.

वासुदेव बळवंत फडके पकडला अशी बातमी होती पण ती पुढें खोटी ठरली. त्यानें आपलें नावाचे किल्येक इसम तयार केले आहेत. त्याचप्रमाणें हरीरामोसी ही किल्येक केले आहेत. ह्मणजे खरा कोण तो समजूं नये, असा त्यांचा इरादा, पण सगळेच धरून मारून टाकिले ह्मणजे त्याही प्रतापि मूर्ति सांपडल्याशिवाय रहाणार नाहींत.

मि० ड्यानियल साहेब पुण्याचे पोलिस सुप्रिंटेंडेंट यांनीं तळेगावाजवळ दरवडे खोरास गाठलें व त्यांची त्यांची लढाई झाली तींत त्या टोळीचा नाईक दौलतराव रामोसी पास त्यांनीं ठार मारिलें व दुसरेही एक दोन जखमी केले. अंधार झाल्यामुळें कांहीं लोक पळाले. तरी त्यांची लूट सर्व पकडली. तींत एक हजार रुपेय रोख, दोन हजारांच्या नोटी, व सुमार लाख रुपयांचे सोन्या चांदीचे जिन्नस आहेत. त्यांतून बहुतांवर आपा साहेब व औंध अशीं नावें आहेत. तेव्हां हा पळस्प्याचा दरवडा असावा असें दिसतें.

गवरनर साहेब इतक्यांत पुण्यास येणार आहेत. फौजा सुमार १५०० दरवडे खोरांच्या पाठलागांत आहेत. व आणखी किल्येक ठिकाणच्या फौजांस कारण पडल्यास जाण्यास तयार असावें असे हुकूम गेले आहेत यावरून महिना पंधरा दिवसांत दरवडेखोरांचें हे सर्व बंड मोडेल असें वाटतें व ईश्वर करो आणि तें लवकरच मोडो असें आह्मी इच्छितों.

---

## दिवाणी कामाची नवीन वाटणी.

थोडे दिवसांमागें आह्मी लिहिलें आहे कीं या जिल्ह्यांतील दिवाणी कामाच्या संबंधानें कांहीं नवीन व्यवस्था केली आहे. त्यांत अकोलें व बाळापुर तालुक्यांचें ५००० रु. पर्यंतचें काम मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी आय. ई. यांजकडे व अकोट जळगांव तालुक्याचे ५००० रु. पर्यंतचें दिवाणी काम अडगाव कोर्टास देणार व खामगावचें मि० डनलप साहेब यांजकडे देणार. या संबंधानें चार चौघांत बाटाघाट झाल्यांत गैरसोई नजरेस येऊन आमचें जें मत झालें तें आह्मी सरकारा पुढें ठेवितों.

वऱ्हाडांत जितकीं कोर्टें आहेत त्या सर्वांपेक्षां अडगाव कोर्टांत दिवाणी काम अधिक आहे हें सरकारास महशूर आहे. त्या कोर्टाचें काम मि. पुरुषोत्तमराव नारायण हे पहात असतांनां काम अधिक तुंबलें होतें ह्मणून कांहीं दिवस त्यांच्या मदतीकरितां एक अधिकारी नेमावे लागले होते. आतां आजपर्यंतचे त्यांपुढचे अधिकारी जरी काम शिलक ठेवीत नसतील तरी त्यांनां पुरेंसें काम त्या कोर्टांत आहे हें आह्माला पक्के माहीत आहे. शिवाय अलीकडे त्या कोर्टाचे अधिकाऱ्यास कांहीं तालुक्यांची मुल्की व फौजदारीही दिली आहे. तेव्हां पुन्हा अधिक काम त्या कोर्टाकडे देऊन नवीन गेलेले अधिकारी मि. केशवरावजी यांनां तितक्या जोखमींत घालणें रास्त नाहीं असें आह्मास वाटतें.

अकोलें जिल्ह्यांतील ५००० पर्यंतचे दाव्याचा जितका भरणा अकोट व जळगाव तालुक्याचा आहे तितका दुसरे तालुक्याचा नाहीं. हेच दोन तालुके एकंदरींत दिवाणी कामाचे संबंधानें मोठे आहेत या तालुक्यांचे ३०० पासून ५००० पर्यंतचें दिवाणी काम पहाण्यास हल्लीं असिस्टंट कमिशनर आहेत त्याचे कोर्टांत जो नंबर आहे त्यावरून सुद्धां असें दिसून येतें कीं त्यांनां तें काम पुरेंसें आहे असें असतां तें सर्व काम अडगाव कोर्टाकडेस देऊन एक असिस्टंट कमिशनरचें काम कमी करणें हेंही चांगलें नाहीं.

ज्या असिस्टंट कमिशनरांस ५००० रुपये पर्यंत दिवाणी दावे घेण्याचा अधिकार आहे त्यांच्या ठरावावर अपील जुडिशियल कमिशनर साहेबाचे कोर्टांत होत असतें, तेव्हां अडगाव कोर्टास जर ५००० चा अधिकार दिला तर त्या कोर्टाचे ठरावावर अपील जुडिशियल कमिशनर कोर्टांत होईल. तसें झालें ह्मणजे डिपुटी कमिशनर कोर्टास जें दिवाणी अपिलांचें काम आहे तें बहुतेक नाहींसें होऊन जुडिशियल कमिशनर कोर्टांत दिवाणी अपिलांचें काम अधिक वाढेल. जुडिशियल कमिनशर कोर्टास हल्लीं जें अपिलाचें काम आहे तें जरी फार नाहीं तरी त्यांनां नेहमी प्रांतभर फिरावें लागतें यामुळें त्यांनां तितकेंच काम पुरेंसें होतें तेव्हां अधिक काम त्या कोर्टाकडे ठेवणें चांगलें नाहीं.

अडगाव कोर्टास २०० रुपयांचा अधिकार असल्यानें त्यावरील अपील डिपुटी कमिशनराकडे होत असतें आणि स्पेशियल अपील जुडिशियल कमिशनर कोर्टांत होत असतें अशी हल्लीं वहिवाट आहे परंतु जर अडगाव कोर्टाचें काम प्रत्यक्ष जुडिशियल कमिशनरच्या ताब्यांत गेलें तर लोकांस हल्लीं दोन अपिलाचीं कोर्टें अकोल्यास मोकळीं आहेत त्यांतील एक नाहींसें होऊन एकच शिल्लक राहील. सामान्य रकमेच्या व महत्वाच्या दाव्यांत दोन्ही अपील कोर्टें अकोल्यास राहिल्यानें लोकांस पैशाचा विशेष खर्च न येतां शेवटचा निकाल करून घेण्याचा मार्ग आहे तो नवीन व्यवस्थेनें बंद झाल्यास लोक फार नाराज होतील. जुडिशियल कमिशनर कोर्टाचे ठरावावर अपील करण्याची सवड आहे. व रेसिडेंट साहेबांचे कोर्ट स्पेशियल अपिलाकरितां आहे हें जरी खरें आहे तरी दर वर्षास तिकडे अपिलें किती होतात, त्यांतून ही मंजूर किती होऊन चौकशी किताची चालते याचा जर विचार केला तर तें कोर्ट, बहुतेक अंशीं नावाचें मात्र आहे. आणखी तें कोर्ट फार दूर असल्यामुळें तिकडे जाऊन लोक अपिलें करीत नाहींत कारण त्या कामास खर्च फार लागतो.

आतां जे मुकद्दमे मोठे रकमेचे आहेत त्यांची गोष्ट खेरीजकरून सामान्य रकमांचे आणि महत्वाचे दाव्यांत झटलें झणजे जुडिशियल कमिशनर कोर्टाचे निर्णयानेंच बहुतेक वादाचा शेवट होतो. तेव्हां त्याच कोर्टास अधिक अधिकार देववतील तितके दिले पाहिजेत.

अडगावकोर्टांत ३०० रुपयेपर्यंतचे दावे हल्लीं होतात त्यांत विशेष महत्वाचे किंवा मोठ्या भानगडीचे दावे फार थोडे असतात ह्मणून निकाल फार झालेले आपले नजरेस येतात, पण वस्तुतः अकोलें एथें चालतात असे महत्वाचे व भानगडीचे दावे अडगावास चालूं लागले तर रोजचा एक किंवा दोन मुकद्दमे चालल्यास चालतील. याहून अधिक काम चालणार नाहीं असें आह्मास वाटतें.

अडगावकोर्टाचे न्यायाधीश सर्वकाल इंग्रजी जाणणारेच राहातील याचा नियम नाहीं. यास्तव त्या कोर्टांत मराठींत काम चालणार व तें चाललेंच पाहिजे. कारण तेथें इंग्रजींत काम चालल्यास प्रयेक मुकद्दम्यांतील ठरावाचें भाषांतर होणें दुरापास्त आहे. व त्याशिवाय त्या कोर्टाकडील अपिलाचें काम जर जुडिशियल कमिशनर कोर्टास. हल्लींच्या वहिवाटीप्रमाणें भाषांतर करण्यासाठीं एक स्वतंत्र कामदार लागणार आहे. क्लार्क व डिपुटी क्लार्क यांच्याकडून तें सर्व काम आटपेल असें आह्मास वाटत नाहीं. हल्लींच त्यांनां भाषांतराचें काम पुरेंसें आहे.

या एकंदर विच्यारावरून आह्मास असें वाटतें कीं, अडगावकोर्टास आहे याहून अधिक अधिकार देणें रास्त नाहीं. अकोलें व बाळापुर तालुक्याचें ५०० रुपयेपर्यंतचें काम स्माल काज कोर्टाकडे गेलें व अकोट, जळगावचे ३०० रुपयेपर्यंतचें पूर्वीप्रमाणेंच काम अडगावकोर्टाकडे ठेवून ५००० रुपयेपर्यंतच्या दिवाणी कामासाठीं एक असिस्टंट कमिशनर स्वतंत्र नेमावा. व एकाच्यानें काम न आटपल्यास दोन नेमावे, व त्यांकडे दुसरे कोणतें काम सांगितलें नाहीं तर दिवाणी कामासाठीं स्वतंत्र एक अधिकारी बस होईल. व त्याप्रमाणें व्यवस्था झाली ह्मणजे वर दर्शविल्याप्रमाणें कोणतीही गैरसोय उत्पन्न न होतां लोकांस सुखकारक होईल आणि हल्लीं जसे सर्वच असिस्टंट कमिशनर सर्वच, कामें पहातात तसे रहाणार नाहींत. एक निराळा असिस्टंट कमिशनर दिवाणी कामासाठीं दिल्यावर बाकीचे असिस्टंट कमिशनर बाकीचे मुल्की फौजदारी वगैरे कामासाठीं ठेविले तर तेंही काम सुरळीत चालून सर्व अडचणीचा निकाल होईल. सबब या गोष्टीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं नजर पुरवावी अशी आमची त्यांस शिफारस आहे.

## वऱ्हाड.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, नवीन धर्मशाळेचे कामाला एथील अगरवाले घराण्यांतील प्रसिद्ध श्रीमति पन्नाबाई व नुन्नाबाई यांनीं प्रत्येकीं १२५ रुपये देणगी देण्याविषयीं आपली इच्छा मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. या कामाचे अग्रणी यांस कळविली व त्यांनीं त्याबद्दल त्यांचे आभार मानिले.

अकोला म्युनिसिप्यालिटीनें ही २०० रुपये या धर्मशाळेला देण्याविषयीं मागच्या कमिटींत मंजूर केलें आहे. या तीन रकमा शिवाय वर्गणीही आजपावेतो १३०० रुपये झाली आहे. व तालुक्यांतूनही रकम येत आहे हें पाहून आह्मी पुन्हा आपला संतोष प्रदर्शित करितों.

मि० टी. रंगराव हैदराबाद एथील रेसिडेंट साहेबांचे अव्वाची रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

मि० एदलजी बहिमनजी आफिशिएटिंग असिस्टंट कमिशनर यांनां दुसरे वर्गाचे माजिस्त्रेट केले आणि त्याशिवाय रेसिडेंट साहेबानीं त्यांनां क्रि. प्रो. चे २९ अ कलमांतील ४ थी रकम शिवाय करून सर्व अधिकार साऱ्या वऱ्हाडांत चालविण्याची परवानगी दिली.

वऱ्हाड आणि नागपुरच्या पोस्टावर नवीन नेमलेले चीफ इन्स्पेक्टर मि. डब्ल्यु जेह्याम हे आपले कामावर रुजू झाले.

रेजिस्ट्रेशन आक्टाच्या ८व्या कलमाप्रमाणें रेसिडेंट साहेबानीं मि० चिंतामण मोरेश्वर आपटे यांस हैदराबाद अमानी मुलुखांत इन्स्पेक्टर नेमिले.

मि० नौलीस साहेब यांस रीतीप्रमाणें डे. कमिशनर असतांनां जे अधिकार मिळावयाचे ते दिल्याचें रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

मि० भीमराव अव्वाची यांनीं दोन महिन्यांची हक्काची रजा घेतली होती ती पुन्हा आपले अर्जावरून त्यांनीं रद्द केली.

जळगावचे आफिशियेटिंग ना० तहशि० मि. नरसो यशवंत यांनां थर्डक्लास माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

नदीकाठावर धर्मशाळेचें काम चालू झालें. तें जमीनीपासून तीन च्यार फूट उंच आलें आहे. बाजूला भरावा घालण्याचेंही काम चालू आहे. तरी बरसात नजीक आली यामुळें लाकूड काम सर्व पुरें होण्या जोगें न सल्यास चढविणार नाहींत असें वाटतें. व त्याकरितां दसरा दिपवाळीपर्यंत ही धर्मशाळा पुरी होत नाहीं असें दिसतें. पायाचा दगड कोरून त्यांत बाटली ठेविली तींत नाणीं, वर्तमानपत्रें व या धर्मशाळेबद्दलचा लेख ठेविला आहे तो लेख येणेंप्रमाणें:—

### धर्मशाळा.

इसवी सन १८७९ सालचे मे महिन्याचे बारावे तारखेस चक्रवर्तिनी विक्टोरिया महाराणी साहेबांचे राज्याचे बेच्याळीसावे वर्षीं, लार्ड लिटन साहेब हिंदुस्थानचे गवरनर जनरल, सर रिचर्ड मीड साहेब हैदराबादचे रेसिडेंट, मि० जोन्स साहेब वऱ्हाडचे कमिशिनर, मेजर लाटन साहेब अकोला जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर यांचे कारकीर्दींत मेहेरबान विकाजी पेस्तमजी मेहेरजी तारापुरवाले यांची जुनी धर्मशाळा सन १२४८ अथवा ४९ फसली मुताबक सन १८३८ अथवा ३९ इसवी या वर्षीं अक्कलकोटावर बांधलेली मोडकळीस आलेली शेट मौफ यांचेच नावानें नवीन बांधावी असें ठरून त्या जुन्या धर्मशाळेचा मसाला व अकोलें शहरचे आणि जिल्ह्याचे लोकांची औदार्यपूर्वक द्रव्याची मदत घेऊन मेहेरबान दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब सी० आय० ई० असिस्टंट कमिशनर, स्माल काज कोर्टाचे जडज आणि अकोले शहरचे म्युनिसिपाल कमिटीचे व्हाइस प्रेसिडेंट यांनीं मनःपूर्वक झटून सर्व तयारी करून आज हा पायाचा दगड बसविला आहे.

क्या० बुलक साहेब अकोल्याचे डिपुटी कमिशनर रजेवर गेल्यानें वर्गावर्गी झाली ती या आठवड्याचे हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध झाली आहे: ती अशी—

मेजर डी डब्ल्यु लाटण साहेब फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर हे आफिशिएटिंग थर्ड क्लास डिपुटी कमिशनर झाले. मि० ए इलियट साहेब सेकंड क्लास असिस्टंट कमिशनरचे आफिएटिंग फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर झाले. मि० सी. डब्ल्यु डेविस साहेब थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर हे आफिशिएटिंग सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

रा. रा. केशव महिपत खारकर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे उमरावतीहून एथें येऊन अडगावास गेले. व अडगावाहून रा. रा. बापुजी रंगनाथ हे परवाचे दिवशीं एथें येऊन वाशिमास गेले.

रा. रा. देवराव जयकृष्ण दारव्ह्याचे तहशिलदार अकोटास येऊन दाखल झाले.

चक्रवर्तिनी साहेबांस ६१ वें वर्ष लागलें त्याच्या उत्साहाकरितां काल टौनहालांत मोठी सभा भरली होती.

क्या० जे एस एफ मेकंझी साहेब म्हैसुराकडून इकडे असिस्टंट कमिशनर येणार होते त्यांची वायव्य प्रांताकडे नेमणूक झाली व ते आतां इकडे येत नाहींत असें रेसिडेन्सी आर्डरवरून समजतें.

उन्हाळ्यामध्यें अकोल्याचें व उमरावतीचें स्मालकाज कोर्ट बंद आहे तोंपर्यंत त्यांवरील जडजांस क्रि. प्रो. चे ३० वे कलमांत नमूद असलेले फर्स्टक्लास माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

मि० आत्माराम भिकाजी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर इलिचपुर यांस हक्काची ३० दिवसांची रजा मिळाली.

उमरावतीचे थर्डक्लास आस्पिटल असिस्टंट मि. महमद बुराण यास वाशिमचे आस्पिटलावर नेमिलें व तेथील मि. सय्यद मेहिदीने यांस उमरावतीस नेमिलें.

मि० गोविंदराज अय्या मुदलियार मोर्शीचे तहशिलदार यांस १२ दिवसांची हक्काची रजा दिली होती ती त्यांचेच अर्जावरून रद्द केली.

या आठवड्यांत हवेचें मान बदलून गेलें आहे. दररोज वारा मोठा सुसाट्याचा सुटून सर्वत्र धूळ उडते व लोकांनां मोठा त्रास होतो. बुधवारीं रात्रीं थोडे पावसाचे थेंब पडले. ते फक्त उघड्यावर निजलेल्या लोकांस उठविण्या पुरतेच होते कारण १० मिनिटां पुढें कांहीं नाहींसें झालें, गुरुवारीं उकाडा पुष्कळ होता. शुक्रवारीं दिवसभर अभ्र होते. व वारा सुसाट्याचा नव्हता त्यामुळें जरा थंडाई वाटत होती. काल दोन प्रहरीं पुन्हा कडकून उकडत होतें. या एकंदर चिन्हावरून पर्जन्य लवकर लागेल असें दिसतें पुण्यास या आठवड्यांत एक व मागच्या आठवड्यांत एक असे दोन चांगले पाऊस पडले. सोलापुरासही एक दिवस चांगला पाऊस पडला असें समजतें.

मि. डनलप साहेब खामगावचे स्मालकाज जडज काळजाच्या रोगानें आजारी झाले आहेत व त्यांनीं तारायंत्रांतून सहा महिन्यांची रजा आणविली असें समजतें.

सांगलीकर नाटकवाल्यांनीं काल जयपाल. नाटक फार चांगलें केलें. एत्या शनिवारीं ते नामांकित मृच्छकटिक हें नाटक करणार आहेत.

वणी जिल्ह्यांतील राळेगावचे सबरजिस्टर मि. देवराव बळवंत यांनीं राजिनामा दिला त्यांचे जागेवर मि. नारायण विठ्ठल देशपांडे यांस नेमिलें.

## वर्तमानसार.

बंगलोरपासून म्हैसूर पावेतो रेल्वे करण्याचें स्टेट सेक्रटरीनीं सांगशन दिलें.

८ व्या तारखेस सिंध कराचीकडे मोठें वादळ झालें. त्यांत कोंबडीच्या अंड्या एवढाले बर्फाचे तुकडेचे तुकडे पडले असें कळतें.

पुण्याचे सार्वजनिक सभेनें हल्लींच्या चोरट्याच्या संबंधानें सरकारास पत्र पाठविलें आहे. त्यांत पोलिसची संख्या कमी व बंदोस्तही कमी तो सुधारून त्यांच्या मदतीस चाकरी लोक यावे. शिवाय गांवच्या मुख्य लो

कांस हत्यारें घेण्याचीं परवानगी द्यावी, गांवांतील पुरूष मंडळीस पाळीपाळीनें चावडीवर निजावयास बोलवावे व वाईट चालीच्या लोकांच्या हाजेऱ्या ठेवावयाची पूर्वींची तजवीज पुन्हा सुरू करावी अशा प्रकारच्या सूचना केल्या आहेत. सु. प.

## हल्लींचें कालमान.

हल्लींचें कालमान मोठ्या चमत्कारिक प्रकारचें दिसत आहे. जिकडे पहावें तिकडे काळजी, भीति व पीडा दृष्टीस पडतात. गेलीं दहा वर्षें ज्याप्रमाणें मोठ्या उलाढालीचीं व संकटांचीं गेलीं त्याचप्रमाणें पुढलें कालमानही उलाढालींचें व संकटाचें दिसतें आहे. असें जरी आहे तरी झालेल्या किंवा होणाऱ्या गोष्टी हिंदुस्थानच्या हितास बाधक अथवा अनिष्ट आहेत असें नाहीं. हे कसें हें पुढें लिहिलें आहे.

गेल्या दाहा वर्षांत युरोप खंडांत मोठमोठाल्या उलाढाली झाल्या. प्रथम अस्ट्रियाची व प्रशियाची लढाई झाली. या प्रसंगीं इंग्लंडानें फ्रान्स देशास मदत दिली नाहीं. याचें कारण हें होतें कीं, इंग्लंडानें फ्रान्स देशास मदत दिली असती तर रशियानें प्रशिया देशांस मदत केली असती व असें झालें असतें ह्मणजे त्यांत अर्थांतच हिंदुस्थानचा संबंध आला असता. ही लढाई झाली तेव्हांच हिंदुस्थानाकडे विलायतेंतील लोकांचें व राजकारणी पुरूषांचें विशेष लक्ष जाण्यास आरंभ झाला. या लढाई नंतर तुर्कस्थान आणि रशियाची लढाई उत्पन्न झाली. या लढाईच्या संबंधानें हिंदुस्थानाकडेस विलायतेंतील लोकांचें लक्ष किती वळलें याची माहिती वाचकांस आहेच. लढाईस आरंभ झाल्याचे अगोदरपासूनच तिजपासून हिंदुस्थानचें नफानुकसान काय या गोष्टीचे विचारास आरंभ झाला होता. हल्लीं अफगाणिस्थानाबेरोबर जी लढाई सुरू आहे ती तुर्कस्थान आणि रशिया यांतील लढाईपासून उत्पन्न झाली आहे. असें ह्मणण्यास चिंता नाहीं. युरोप खंडांत भांडणाचीं कारणें अजूनही नाहींशीं झालीं नाहींत. व जोंपर्यंत हीं कारणें नाहींशीं होतें नाहींत तों पर्यंत हिंदुस्थानच्या संबधानें विलायतेंतील लोकांस विच्यार करण्यास एक मोठें कारण राहणार आहे ( याशिवाय आफ्रिका खंडांत जुलू लोकांबरोबर इंग्रजांची लढाई सुरू आहे ती, व ब्रह्मदेशांतही घोटाळा होण्याचा संभव आहे ती, ) अफगाणिस्थानची लढाई आणि इजिप्त देशांतील इंग्रज आणि फ्रेंच लोकांच्या स्पर्धेपासून भांडण होण्याचा संभव, ह्या सर्व बाह्य कारणामुळें हिंदुस्थानाविषयीं विलायतेंतील लोकांत विचार होण्यास जसें कारण झालें तसें पूर्वीं कधीच झालें नव्हतें.

देशाच्या परस्पर पर्यवसानाच्या संबंधानें गेल्या दहा वर्षांत जशीं अनेक व मोठमोठालीं कारणें झालीं त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत अनेक व मोटमोठालीं कारणें झालीं. गेल्या दहा बारा वर्षांत सरासरी पांच सहा दुष्काळ पडले त्यामुळें सरकारास अतिशय खर्च आला इतकेंच नाहीं परंतु खर्च होऊनही व्हावें तसें प्रजापालन झालें नाहीं. लक्षावधि रुपये खर्च झाले परंतु अन्न नसल्यामुळें लक्षावधि लोक प्राणास मुकले. हल्लीं या देशांत आगगाडीचे रस्ते झाल्यामुळें हिंदुस्थानच्या एका भागांत पर्जन्य पडून धान्य झालें नसतां उपाशीं मरण्याची भीति असूं नये परंतु दक्षिण देशांतील सन १८७६ व १८७७ सालांतल्या दुष्काळापासून असें अनुभवास आलें आहे कीं, आगगाडीनें धान्य जरी आलें तरी हजारो लोक अन्नावांचून मेल्या खेरीज रहात नाहींत. याचें कारण प्रजेजवळ अर्थ नाहीं. याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. परंतु हें कारण राज्यकर्ते आजपर्यंत मुळींच कबूल करीत नव्हते. हिंदुस्थान देश समृद्ध नसून दरिद्री आहे अशी त्यांची अलीकडे बरीच खात्री होत चालली आहे. अलीकडे पडलेल्या दुष्काळामुळें व त्यापासून प्रजेंची खरी स्थिति राज्यकर्त्यांच्या लक्षांत आल्यामुळें ही स्थिति कोणच्या उपायांनीं बदलेल या विषयीं हिंदुस्थानांत व मुख्यत्वेंकरून विलायतेंत मोठी वाटाघाट सुरू झाली आहे. दुष्काळ संबंधी चौकशी करण्याकरितां जें कमिशन नेमिलें होतें त्याच्या होणाऱ्या रिपोर्टापासून राज्यव्यवस्थेंत थोडी तरी अदलाबदल होईल असें वाटूं लागलें आहे. दुष्काळामुळें ह्या देशाची खरी स्थिति काय आहे हें ज्याप्रमाणें उघडकीस आलें व जिकडेस विलायतेंतील विचारी व विद्वान लोकांचें लक्ष्य लागण्यास कारण झालें, त्याजप्रमाणें दुसरीही अनेक कारणें झालीं. ( विलायतेहून येणाऱ्या कापसाच्या मालावरील जकात कमीं केली हें, वर्तमानपत्राविषयींचा कायदा, सन १८७५ तील दक्षिणेंतल्या शेतकरी लोकांचा दंगा, हीं व दुसरीं कित्येक कारणें ह्या देशाच्या खऱ्या स्थितीकडेस लक्ष्य लागण्यास कारण झालीं आहेत, ) परंतु या सर्वांत हिंदुस्थानच्या जमाखर्चाची अव्यवस्था हें मोटें कारण झालें.

आतां वर लिहिलेल्या सर्व गोष्टी हिंदुस्थानास अनिष्ट प्रकारच्या झाल्या तथापि त्यांपासून एक मोठा फायदा झाला तो असा कीं ह्या देश व यांतील प्रजा अत्यंत निकृष्टावस्थेंत आहेत अशी विलायतेंतील लोकांची खात्री झाली. दुसरें त्यांस असें वाटूं लागलें कीं हल्लीं गाडें चालू आहे त्याप्रमाणेंच चालू ठेवलें असतां तें केव्हां तरी खळग्यांत पडल्या खेरीज रहाणार नाहीं. ह्या कारणामुळें कोणच्या उपायांनें या देशाची हल्लींची स्थिति बदलेल याविषयीं तिकडील लोक विचार करूं लागले आहेत. मि, हिंडमन यांनीं हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं एका मासिक पुस्तकांत दोन निबंध लिहिलेले आहेत. मि. फासेट हे तर आज कित्येक दिवसांपासून या देशाच्या लोक स्थितिविषयीं ओरड करीत आहेत. मुंबई सरकारचे माजी चीफ सेक्रेटरी मि. चापमन यांणीं कोणकोणच्या बाबदींत खर्च कमी कारावा याविषयीं एक पत्र लिहिले असून त्यांत असें लिहिलें आहे कीं नेटिब लोकांस जास्त जागा देत जाव्या. सन १८६६ सालीं हिंदुस्थानच्या स्थितीविषयीं पार्लमेंट सभेच्या नेमलेल्या कमिटी समोर व पब्लिकवर्क्स खात्याविषयीं चौकशीं करण्याकरितां हल्लीं जी कमिटी नेमिली आहे तिजसमोर जी खर्चाची अव्यवस्था बाहेर पडली आहे तिजवरूनही हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत फेर केला पाहिजे असें सर्वांस वाटू लागलें आहे. येणें प्रमाणें आतां कांहीं तरी चांगला फेरफार होईल असें कालमान दिसत आहे. गेल्या दहा बारा वर्षांत या देशाच्या संबधानें जरी कित्येक अहिताच्या गोष्टी झाल्या. तथापि आह्मी पुढील कालमानाविषयीं जें भाविष्य केलें आहे तें खरें ठरल्यानें मागील गोष्टीविषयीं कोणास वाईट वाटणार नाहीं. ने. ओ.


## जाहिरात

COMEDY OF ERRORS.

### कामडी आफ एरर्स.

अथवा,

### भ्रांतिकृतचमत्कार

या नावाचें शेकस्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिराती.

नवीन सुदर्शन चरित्र नाटक, मार्कंडेय चरित्र व कबीराख्यान.

खालीं सही करणाराकडून देण्यांत येते कीं, देवी भागवतांतील कथेच्या आधारें मीं '' सुदर्शन चरित्र '' या नांवाचें सप्तांकी नाटक सुमारें दोन पृष्ठें संस्कृत तसेंच हिंदुस्थानी आणि थोडा रानटी भाषेचा मासला दाखवून महाराष्ट्र भाषेंत रचिलें आहे. यामध्यें आर्या, ओव्या, दिंड्या, अभंग, साक्या, अंजनीगीत, श्लोक, कांहीं तऱ्हेतऱ्हेचीं वृत्तें, पदें, झुल्ले, गजल आणि लावण्या मिळून सुमारें १०५ पद्यें असून बाकीचें केवळ भाषण अशा प्रकारें याची रचना आहे. या नाटकाबद्दल मला दक्षिणा प्राईझ कमिटीकडून बक्षीस मिळालें. यांत शृंगारादि रस बहुत गुलजारीचे आहेत. याचीं पृष्ठें २२५ होतील. यांत कांहीं देखाव्याचीं चित्रेंही घातलीं जातील. याचा सांचा द्वादशपत्री असून कागदही चांगले जाड असतील याचें संविधानक मोठ्या चातूर्याचें असून त्यांत देवीचें महत्व व तिच्या मंत्रादिकांचा प्रभाव फार चमत्कारिक दर्शविला आहे.

हें नाटक तसेंच मार्कंडेय कथानक व कबीराख्यान आणि शेवटीं काशीची भूपाळी, या सर्वांचें एकच पुस्तक बांधावें असें योजिलें आहे. हें छापून व बांधून तयार करण्याचें काम, पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत लवकरच सुरू होईल. हें घेणारांस फार सोयीवार पडावें, यासाठीं याची किंमत एक रुपया ठेविली आहे, तथापि ता० १५ एप्रिलचे आंत सही करणारास दोन आणे कमी पडतील. बाहेर गांवच्या लोकांस पोस्टेज व बंगी खर्च मिळून ०२ शिवाय पडेल.

माझी ग्रंथरचना करण्याची शिस्त, मीं पूर्वीं केलेलें गौरीहरविनोद नाटक छापून प्रसिद्ध झालें आहे यावरून प्राय: त्याचे वाचकांच्या समजण्यांत आलीच असेल. सारांश रसिक ज्ञात्यांनीं कविपरिश्रमादि कारणें मनांत आणून या पुस्तकास आश्रय द्यावा अशी त्यांस बिनयपूर्वक सूचना आहे.

सदर्हू पुस्तकाबद्दल अगाऊ वर्गणी पाठविणें ती पुणें ज्ञानप्रकाशचे म्यानेजर यांजकडे पाठवावी.

सूचना—सदर्हू जाहिरात मराठी वर्तमानपत्रकर्त्यांनीं आपआपल्या वर्तमानपत्रांत निदान तीन वेळ घ्यावी. त्याबद्दल त्यांस एक पुस्तक पाठविण्यांत येईल.

अनंत दीक्षित बिन महादेवदीक्षित जोशी चिपळोणकर.

## महामारी

हा भयंकर रोग सर्वत्र प्रसिद्ध आहे त्याविषयीं चांगली माहिती देणें व त्यावर बक्कशीर उपाय योजणें फार अवश्यक आहे. ह्मणून मिरज संस्थानचे मेडिकल आफिसर रा. रा. त्रिंबक सखाराम सिरवलकर एल. एम. यांनीं या विषयावर एक लहानसें उत्तम पुस्तक तयार केलेलें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत सहा आणे. बाहेर गावीं नेणारास एक आणा अधिक पडेल.

## रामजोशीकृत कविता.

अथवा

लावण्या भाग दुसरा.

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति लवकरच खलास झाल्यामुळें हल्लीं दुसरी आवृत्ति विशेष सुधारून टाइपावर छापविली आहे प्रथमावृत्तीपेक्षां या खेपेस कांहीं उत्कृष्ठ नवीन लावण्या घालून टीपा वगैरे दिल्या आहेत. त्यांची किंमत पूर्वींप्रमाणें अगदी थोडी ह्मणजे आठ आणे ठेविली असून बाहेरगावीं मात्र टपाल खर्चाबद्दल अर्धा आणा अधिक पडेल. पुस्तकें पुण्यास आमच्याकडे किंवा ज्ञानप्रकाश व शिवाजी छापखान्यांत व मुंबईस इंदुप्रकाश छापखान्यांत मिळतील. कळावें तारीख १८ डिसेंबर सन १८७८ इसवी.

शंकर तुकाराम शालिग्राम.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांतही हीं पुस्तकें विक्रीकरितां आलीं आहेत.

## बापुगोखल्याचें चरित्र.

जुन्या बखरीचे आधारानें हें नवीन उत्तम पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास तयार केलेलें आमच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलें आहे. याची किंमत १ रुपया असून डाकहशील एक आणा आहे. अगदी अलीकडील ह्मणजे पेशवाई अखेरच्या या शूर पुरुषाचें नाव सर्वत्र मशहूर आहे सबब त्याचें यथार्थ व साद्यंत चारित्र बहुतास वाचावयास व संग्रहीं बाळगण्यास उत्साह असेल ह्मणून आह्मी मुद्दाम याच्या प्रती विक्रीस आणविल्या आहेत. सर्वांस कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.


हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.